रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३१४ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २१ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹


## अजित पवारांचा अर्ज बाद

**पुणे :** बारामती मतदारसंघात शरद पवार यांची मुलगी सुप्रिया सुळे आणि सून सुनेत्रा पवार यांच्यात मुकाबला होणार आहे. या निवडणुकीत शरद पवार यांनी आपलं बळ लेकीच्या पारड्यात टाकलं आहे. तर अजित पवार यांनी पत्नीसाठी कंबर कसली आहे. या निवडणुकीत पत्नीचा अर्ज बाद झाल्यास दावा कायम राहावा म्हणून अजित पवार यांनी अर्ज दाखल केला होता. मात्र, अर्ज छाननीत अजितदादांचाच अर्ज बाद झाला आहे. दरम्यान, सुप्रिया सुळे यांचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. सुनेत्रा पवार यांच्यापाठोपाठ सुप्रिया सुळे यांचा अर्ज वैध ठरल्याने आता नणंद-भावजयांमध्ये थेट लढत होणार आहे.


महालक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र
कासू/पेण/रायगड

कासू रेल्वे स्टेशनजवळ चालवायला देणे आहे.
इच्छुकांनी संपर्क साधावा :
मोहन वेखंडे - ९८५००१५२०१/८१४९४८०८४८

सुविधा १५ रुम + स्विमिंग पूल/रेनडान्स, गार्डन एरिया, किचन-२/चुल. कॉन्फरन्स हॉल + ओपन रेस्टॉरंट, टॉप फ्लोअर, रिसेप्शन, कार्यक्रम हॉल + लॉन एरिया, मोठा पार्किंग एरिया + प्लेग्राऊंड सोबत विविध सुविधा उपलब्ध.







## मुश्ताक अंतुलेंचा राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशाचा
# आत्मघातकी निर्णय
### काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचे मत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांनी माजी मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांच्या विरोधात कायमच भूमिका घेतली होती. त्यामुळे असंख्य मुस्लीम समाज आजही तटकरेंवर कमालीचा नाराज आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुश्ताक अंतुले यांचा अजित पवार गटात जाऊन तटकरेंना मदत करण्याचा निर्णय हा आत्मघातकी असून, त्यांची ही भूमिका अत्यंत चुकीची ठरणार आहे, असे परखड मत काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी कृषीवलशी बोलताना व्यक्त केले.**

राजकारणात ज्यांचे बोट धरून सुनील तटकरे चालू लागले, त्याच बॅ. अंतुले यांची कारकीर्द सुनील तटकरे यांनीच संपविली, हे काही लपलेले नाही. माजी मुख्यमंत्री अंतुले यांचा फोटो प्रचार बॅनवर लावण्याचा अधिकार तटकरेंना अजिबात नाही. मात्र, या लोकसभा निवडणुकीत तटकरेंना पराभव दिसत असल्याने ते राजकीय खेळी करत आहेत. हे मतदार चांगलेच ओळखून आहेत. त्यांनी आता मुस्लीम समाजाची मते मिळविण्यासाठी फोडाफोडीची केविलवाणी धडपड सुरु केली आहे. मुश्ताक अंतुले हे बॅ. अंतुले यांचे जावई आहेत, शिवाय ते मोठे नेते आहेत. त्यांना मोठ्या



> मी येत्या सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात जाहीर प्रवेश करणार आहे, अशी माहिती स्वतः काँग्रेसचे नेते मुश्ताक अंतुले यांनी 'कृषीवल'शी बोलताना दिली. त्यामुळे त्यांच्या पक्षप्रवेशाबाबत जिल्ह्यात सुरु असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

प्रमाणात मानणारा वर्ग रायगड लोकसभा मतदारसंघात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) जाण्याच्या तयारीत अंतुले असल्याचे

पान ५ वर

## फौजदारी न्याय व्यवस्थेत बदलांसाठी देश सज्ज
### सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांचे प्रतिपादन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी नवीन फौजदारी न्याय कायदे समाजासाठी एक ऐतिहासिक क्षण असल्याचे म्हटले आहे. भारत आपल्या फौजदारी न्याय व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदलांसाठी तयार आहे. त्याचबरोबर सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची संधी सोडू नका, असे आवाहनही त्यांनी केले. शनिवारी 'गुन्हेगारी न्याय प्रणाली प्रशासनातील भारताचा प्रगतीशील मार्ग' या विषयावर आधारित एका कार्यक्रमात बोलत ते होते. यावेळी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल, महाधिवक्ता आर वेंकटरामानी

पान ५ वर

> **तीन कायदे कोणते?**
> देशाच्या गुन्हेगारी न्याय व्यवस्थेत पूर्णपणे बदल करण्यासाठी, 'भारतीय न्यायिक संहिता', 'भारतीय नागरी संरक्षण संहिता' आणि 'भारतीय पुरावा कायदा' हे नवीन कायदे १ जुलैपासून लागू होणार आहेत. तथापि, 'हिट-अँड-रन' प्रकरणाशी संबंधित तरतूद त्वरित लागू होणार नाही. या तिन्ही कायद्यांना गेल्या वर्षी २१ डिसेंबर रोजी संसदेची मंजुरी मिळाली होती आणि २५ डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्याला मंजुरी दिली होती.

## रायगडला अवकाळी पावसाने झोडपले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
दक्षिण रायगडला शनिवारी (दि. २०) झालेल्या अवकाळी पावसाने झोडपले आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी दुपारनंतर वादळी वाऱ्यासह पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. महाड तालुक्यातील वरंध घाट, बिरवाडी महाड परिसरात पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. आंबा, भुईमूग, भाजीपाला पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यभरातही अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. सोलापूर, धाराशीव आदी जिल्ह्यांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, हवामान खात्याने अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवला होता. मागील आठ दिवसांपासून उन्हाचा तडाखा आणि उष्णता जाणवत होती. उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. मात्र, शनिवारी दुपारनंतर अवकाळी पावसाने हजेरी लावल्यानंतर वातावरणात गारवा निर्माण झाला. अवकाळी पावसाने नागरिकांना गरमीपासून जरी दिलासा मिळाला असला, तरी शेतकऱ्यांचे पिकांचे मात्र मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

## खासदार होण्याचे स्वप्न धुळीला
### तटकरेंसह सहा उमेदवारांचे अर्ज छाननीत बाद

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
रायगड लोकसभा निवडणुकीसाठी २८ उमेदवारांनी ४० अर्ज दाखल केले होते. शनिवारी झालेल्या छाननीमध्ये सात उमेदवारांचे १३ उमेदवारी अर्ज बाद झाले आहेत, तर २१ जणांचे २७ अर्ज वैध ठरले आहेत. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अनिकेत तटकरे, बहुजन समाज पार्टीचे मुजफ्फर जैनुद्दीन चौधरी आणि अनिल बबन गायकवाड या उमेदवारांसह अन्य चार अपक्षांचे अर्ज बाद ठरले आहेत. २२ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. त्यानंतरच रायगडच्या घमासानचे चित्र स्पष्ट होणार आहे.

निवडणूक आयोगाचे निरीक्षक संजीव कुमार झा यांच्या उपस्थितीत

पान ५ वर

> **कोणाचे अर्ज बाद**
> अनिकेत सुनील तटकरे, (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी), नरेश गजानन पाटील (अपक्ष), मुजफ्फर जैनुद्दीन चौधरी (बहुजन समाज पार्टी), उस्मान बापू कागदी,(अपक्ष), अनिल बबन गायकवाड (बहुजन समाज पार्टी), भुपेंद्र नारायण गवते (अपक्ष), घाग संजय अर्जुन (अपक्ष)
>
> **२१ अर्ज वैध**
> अनंत पद्मा गिते (अपक्ष), अनंत बाळोजी गिते (अपक्ष), अनंत गंगाराम गिते (शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे), नितीन जगन्नाथ मयेकर (अपक्ष), आस्वाद जयदास पाटील (शेकाप), मंगेश पद्माकर कोळी, (अपक्ष), प्रकाश बाळकृष्ण चव्हाण (भारतीय जवान किसान पार्टी), पांडुरंग दामोदर चौले (अपक्ष),

पान ५ वर

















वे|ध|क

## आ.रईस शेख यांचा राजीनामा

**ठाणे :** भिवंडीचे विद्यमान आ.रईस शेख यांनी राजीनामा दिला आहे. अंतर्गत कुरघोडीच्या राजकारणातून शेख यांनी पक्षाकडे आमदारकीचा राजीनामा सोपवला आहे. यानंतर शेकडो महिला कार्यकर्त्या रईस शेख यांच्या कार्यालयाबाहेर समर्थनार्थ एकत्र झाल्याचं पाहायला मिळालं.सध्या लोकसभा निवडणुकीचं राजकारण तापलेलं असतानाच भिवंडी पूर्व विधानसभेचे समाजवादी पक्षाचे शेख यांनी पक्षांतर्गत कुरघोडीच्या राजकारणाला कंटाळून आपल्या आमदार पदाचा राजीनामा दिला आहे. शेख यांनी अबू आजमी यांच्याकडे आमदारकीचा राजीनामा सुपूर्द केला आहे.

## कोकणातून धनुष्यबाण हद्दपार?

**मुंबई :** राणेंना भाजपकडून उमेदवारी जाहीर झाली त्यानंतर चर्चा सुरु झाली ती शिवसेनेच्या धनुष्यबाणाची. कारण पहिल्यांदा तळ कोकणात शिवसैनिक धनुष्यबाणावर नाही तर भाजपच्या कमळ चिन्हावर मतदान करणार आहेत. त्यामुळे मागील २० वर्षांची धनुष्यबाणावर मतदान करण्याची परंपरा खंडीत होणार आहे. रत्नागिरी सिंधुदुर्गाच्या जागेसाठी उदय सामंत यांनी फॉर्म भरण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. परंतु मतदारसंघ भाजपकडे तर रायगड राष्ट्रवादीच्या वाट्याला गेला. रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि रायगड लोकसभा मतदारसंघात धनुष्यबाण हे चिन्ह मतदान यंत्रावर यंदा पाहायला मिळणार नाही.

## मतदान केंद्रावर विषारी साप

**नागपूर :** लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान आज देशासह महाराष्ट्रातील लोकसभेच्या पाच जागांचाही समावेश आहे. भंडारा-गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर, नागपूर, रामटेक लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. मात्र मतदानादरम्यान नागपूरच्या केडीके कॉलेज मतदान केंद्रातएक धक्कादायक घटना घडत असल्याचे समोर आले आहे. या मतदान केंद्रात साप आढळल्याने तिथे उपस्थीत कर्मचारी आणि नागरिकांचा गोंधळ उडाला. दक्षिण नागपुरातील केडीके कॉलेज मतदान केंद्रात मतदान सुरू असताना विषारी साप आढळून आला. या घटनेमुळे काही काळ मतदानासाठी आलेल्या मतदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# ‘इंडिया’ आघाडीचे पारडे जड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

उत्तर प्रदेशात पहिल्या टप्प्यातील ज्या आठ जागांवर शुक्रवारी (दि.१९) मतदान झाले. त्यापैकी सर्व जागांवर २०१४ मध्ये भाजपने विजय मिळविला होता. तर मागील निवडणुकीमध्ये भाजपला या पैकी तीन जागांवरच विजय मिळविण्यात यश आले होते. यंदाच्या निवडणुकीतील राजकीय समीकरणे पाहता यावेळीही भाजपपेक्षा विरोधकांच्या ‘इंडिया’ आघाडीचेच पारडे येथे जड वाटत आहे.




मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारापूर्वीच उत्तर प्रदेशात सर्व जागांवर भाजपला विजय मिळेल असा दावा करायला सुरुवात केली होती. चुकीच्या मुद्यांच्या आधारे समाजाची एक विशिष्ट मनोभूमिका तयार करण्याचा प्रयत्न करायचा, या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनुभवसिद्ध धोरणाचे प्रतिबिंबच या दाव्यांमध्येही दिसत होते. अशातच विरोधकांच्या आघाडीतील मतभेदांमुळे तर, भाजपकडून करण्यात येत असणाऱ्या दाव्यांना अधिकच बळ मिळत होते. परंतु,जशी निवडणुकीची वेळ जवळ येत गेली तसतसे पहिल्या टप्प्यात ज्या जागांवर मतदान झाले त्या जागांपैकी अधिकाधिक जागांवर विजय मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आदेश पक्ष नेतृत्वाकडून देण्यात आले.

या निवडणुकीमध्ये येथील समीकरणे बदलली आहेत. सीबीआयची टांगती तलवार डोक्यावर असल्यामुळे मायावती यांनी तडजोड केल्याचे दिसत आहे तर, राष्ट्रीय लोक दलानेही राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये सहभाग घ्यायचा निर्णय घेतला आहे. मायावती यांनी ‘एकला चलो रे’चा दिलेली नारा आणि पहिल्या टप्प्यातील आठपैकी तीन जागांवर मुस्लिम उमेदवार देत मुस्लिम मतांचे विभाजन होऊन भाजपला फायदा होईल याची काळजी घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

## ‘लंकेंमुळे विखेंची झोप उडाली’

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।**

नीलेश लंकेंमुळे विखे बाप-लेकांची झोप उडाली आहे. त्यांनी एका उद्योजकाला माझ्याकडे मध्यस्थीसाठी पाठवले होते. लंके सोडून दुसऱ्याला उमेदवारी द्या, असे त्यांचे म्हणणे होते. परंतु, मी त्यांचे ऐकले नाही. यावरून ते लंकेंना किती घाबरलेत हे दिसते, असा गौप्यस्फोट शरद पवार यांनी केला.



नगरचे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेचा शुक्रवारी समारोप झाला. यावेळी बाळासाहेब थोरात, आदित्य ठाकरे, रोहित पवार यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले, आपला उमेदवार हिरा आहे. तो या मतदारसंघातील लोकांचे प्रश्न नक्कीच प्रभावीपणे मांडील. त्यांना भाषेची कोणतीही अडचण येणार नाही. विखे पिता-पुत्रांना आत्मविश्वास नाही. ते या पक्षातून त्या पक्षात फिरत असतात. लंके यांच्याकडे संपत्ती नाही, परंतु माणुसकी आणि लोकप्रेम ाचा खजिना आहे. आता लोकांत मतासाठी दहशत करीत आहेत,फअसा आरोप केला. आदित्य ठाकरे यांनीही, लंके यांना आमचे शिवसैनिक अनिलभैय्यांची कमी पडू देणार नाहीत, अशी ग्वाही दिली. २४ तास तो तुम्हाला साथ देईल. तुमची दहशत मोडून काढण्याचा प्रयत्न करतो आहे मला एकदा संधी द्या, रात्रंदिवस तुमच्या सेवेत राहील.

## बालेकिल्ल्यातच शिंदेंना घाम

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्याम ध्येच शिवसेनेची कोंडी झाली आहे. भारतीय जनता पक्षानं ताणून धरल्यानं अद्याप ठाणे, पालघरच्या जागांचं घोडं अडलं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीकांत शिंदेंची उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा शिंदेंच्या शिवसेनेनं अद्याप तरी केलेली नाही.



मुख्यमंत्री शिवसेनेचा असताना कोकण पट्ट्यातून धनुष्यबाण गायब होताना दिसत आहे. अजित पवारांची राष्ट्रवादी म हायुतीत असल्यानं आणि रायगडचे विद्यमान खासदार सुनील तटकरे त्यांच्यासोबत असल्यानं रायगडची जागा राष्ट्रवादीला गेली. तर रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये शिवसेनेने माघार घेत ही जागा भाजपला सोडली. इथून भाजपनं नारायण राणेंना तिकीट दिलं आहे.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग, रायगडनंतर आता ठाणे जिल्ह्यात मधनुष्यबाणफ संकटात येण्याची चिन्हं आहेत. कल्याण, ठाण्यापैकी एक जागा सोडा यासाठी शिंदेंवर दबाव आहे. कल्याणमध्ये शिंदेंचे पुत्र श्रीकांत शिंदे आहेत. त्यांची उमेदवारी पक्षानं जाहीर केलेली नाही.

तर ठाण्याचे खा. राजन विचारे पक्षफुटीनंतरही उद्धव ठाकरेंसोबत असल्यानं इथे शिंदे उमेदवाराच्या शोधात आहेत. आ. प्रताप सरनाईक यांचे नाव आघाडीवर आहे.

लेकाची खासदारकी आणि राजकीय गुरुंची कर्मभूमी वाचवण्याची धडपड सध्या शिंदे करत आहेत. शिवसेनेला सर्वप्रथम सत्ता ठाण्यातच मिळाली. शिंदेंचे राजकीय गुरु आनंद दिघेंनी ठाण्यात सेना रुजवली, वाढवली. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते ठाणे जिल्हाप्रमुख राहिले.

त्यामुळे गुरुंनी जपलेला, भाजपकडून खेचून आणलेला बालेकिल्ला भाजपला सोडण्यास शिंदे तयार नाहीत. तर दुसरीकडे मुलाचं राजकीय करिअर संपू नये यासाठीही त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. श्रीकांत शिंदे २०१४ पासून कल्याणचे खासदार आहेत.

## भाजपाने फिरवली शेतकऱ्यांकडे पाठ

**सोलापूर :** शेतकऱ्यांच्या मतांचा फायदा घेत भाजप सत्तेत आले, पण शेतकरी अडचणीत असताना त्यांच्याकडे पाठ फिरविली, अशी टीका महाविकास आघाडीच्या सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी पंढरपूर तालुक्याच्या प्रचार दौऱ्यावेळी केली. दहा वर्षांत सोलापूरकरांचा भाजपकडून विश्वासघात झाल्याचेही त्या म्हणाल्या. तसेच, महागाईने जनता त्रस्त झाली असून चारशे रुपयांचा गॅस सिलिंडर अकराशेंवर पोचला आहे. शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव नाही. त्यामुळे मत मागण्याच्या उद्देशाने नव्हे तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेण्यासाठी मी गावभेट दौरा करीत असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## कमी टक्केवारीने सर्वांचीच हवा गुल!

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

विदर्भातील पहिल्या टप्प्यात पाच लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडले. नागपुरात भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस यांच्यात थेट सामना होत असला तरी भाजपचे मतदान केंद्र नियोजन मजबूत असल्याचे स्पष्ट झाले. गडचिरोली नक्षलग्रस्त जिल्हा असला तरी त्याचा मतदानावर परिणाम झाला नाही. भंडारा-गोंदिया, रामटेक आणि चंद्रपूर येथे महायुती व महाविकास आघाडीत जोरदार लढत झाल्याने निकाल नक्की कुणाच्या बाजूने लागेल हे सांगता येणार नाही.



महाराष्ट्रातील नागपुरातील लढतीकडे देशाचे लक्ष लागून आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले. सकाळीच पुरूष, पहिल्यांदा मतदान करणारे युवक बाहेर पडले. दुपारी महिला मतदानासाठी बाहेर पडल्या. रामटेकमध्ये शेवटच्या टप्प्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दोन दिवस तळ ठोकून होते. खासदार कृपाल तुमाने यांची उमेदवारी कापत काँग्रेसचे आमदार राजू पारवे यांना पक्षात घेत शिवसेनेची उमेदवारी दिली.

पण, सक्षम उमेदवार न सापडल्याने बाहेरून उमेदवार आणला आणि उभा केला. त्यातही तुमानेंच्या कार्यकर्त्यांची नाराजी होतीच. मतदारसंघात बौद्ध सम ाजाचे साडेसहा लाखांच्या आसपास मतदान आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गट व काँग्रेस यांच्यात लढत रंगल्याने नक्की कोण विजयी होईल, याचा अंदाज बांधणे कठीण आहे.

## २०२४ नंतर पुन्हा निवडणुका होणार नाहीत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मोठे वक्तव्य केले आहे.



मोदी पुन्हा सत्तेत आले तर घटना बदलल्याशिवाय राहणार नाहीत. यासाठी मोदींविरोधात मतदान करा, असे आवाहन आंबेडकर यांनी केले आहे.

हिंगोली येथील वंचितचे उमेदवार डॉ. बी. डी. चव्हाण यांच्या प्रचारासाठी आंबेडकर आले होते. शिंदे आणि भाजपम ध्ये लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपावरून वाद सुरु आहेत.

शिंदे यांचा म्हणावा तसा फायदा लोकसभेला न दिसल्यास विधानसभेला वेगळे चित्र दिसू शकते, अशा चर्चा आमदारांसह राजकीय वर्तुळात सुरु आहेत. मोदी पुन्हा सत्तेत आले तर घटना बदलल्याशिवाय राहणार नाहीत. यासाठी मोदींविरोधात मतदान करा, असे आवाहन आंबेडकर यांनी केले आहे. २०२४ नंतर पुन्हा निवडणुका होणार नाहीत. जो ऐकणार नाही त्याला तुरुंगात टाकले जाईल, असे आंबेडकर म्हणाले.

## प्रतिभाताई पाटील करणार घरबसल्या मतदान

**। पुणे । प्रतिनिधी ।**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ८५ पेक्षा अधिक वयोम ान असलेल्या ज्येष्ठांना घरबसल्या म तदान करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या घरबसल्या मतदान करणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाने या संदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे. निवडणूक आयोगाने ८५ पेक्षा जास्त वयोमान असलेल्यांना तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असलेल्या व्यक्तींना घरबसल्या मतदान करण्याची मुभा दिली आहे. त्यासाठी त्यांनी १२ फहा अर्ज भरून दिल्यास जिल्हा निवडणूक यंत्रणा संबंधित मतदारांच्या घरी जाऊन मतदानाची प्रक्रिया पूर्ण करणार आहे. जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघांमध्ये अशा ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांपर्यंत केंद्रस्तरीय अधिकारी पोहोचले असून त्यांना मतदानाच्या पर्यायाबाबत विचारणा करण्यात आली आहे.



माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील सध्या पुण्यात राहत असून त्यांचे वय नव्वदीच्या घरात आहे. या संदर्भात यांच्या कार्यालयाकडूनही जिल्हा निवडणूक शाखेकडे घरबसल्या मतदानाची सवलत मिळावी, याबाबतचा १२ ड अर्ज केला होता. जिल्हा निवडणूक शाखेने या संदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिला असून पाटील यांना घरबसल्या मतदान करण्याची संधी दिली आहे.

प्रकृती अस्वास्थ्यामुळे पाटील गेल्या एक महिन्यापासून उपचार घेत आहेत. त्यामुळे त्यांना प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणे शक्य नव्हते. त्यामुळेच त्यांनी या पर्यायाचा लाभ घेतला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्याकडून १२ ड हा अर्ज भरून घेण्यात आला आहे. त्या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण झाली असून त्या घरबसल्या मतदान करू शकणार आहेत.

## ज्योती मेटेंची निवडणूक माघार

**। बीड । प्रतिनिधी।**

लोकसभा निवडणुकीमध्ये सुरुवातीपासूनच ज्योती मेटे या लोकसभा निवडणुक लढवणार असल्याची मेटे यांनी दिली होती. मात्र, लोकसभा निवडणूक शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या तुतारी चिन्हावरून लढणार अशी चर्चा होऊ लागली. शरद पवार यांनी ज्योती मेटे यांना उमेदवारी न देता बजरंग सोनवणे यांना उमेदवारी दिली. त्यानंतर आता थेट ज्योती मेटे यांनी लोकसभेतूनच माघार घेतल्याचं पत्रकार परिषद घेत सांगितलं आहे.



लोकसभा निवडणुकीमध्ये दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर या लोकसभा निवडणुकीमध्ये ज्योती मेटे यांनी सक्रिय होत लोकसभा लढवावी अशी शिवसंग्राम कार्यकर्त्यांनी ज्योती मेटे यांना मागणी केली. यात अनेक बैठका झाल्या, अखेर ज्योती मेटे यांनी लोकसभा निवडणूक लढवण्याचं ठरवलं. मात्र कोणाकडून लढवणार हा प्रश्न होता. त्यानंतर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या भेटीगाठीनंतर ज्योती मेटे या राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून निवडणूक लढवणार अशी चर्चा जिल्हाभर सुरु झाली. मात्र, शिवसंग्रामची कोणतीही भूमिका पाहायला मिळाली नाही.

## ‘एमआयएमचा उमेदवार भाजपची ‘बी’ टीम’

**। पुणे । प्रतिनिधी ।**

देशभरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षाकडून उमेदवार जाहीर करण्यात आले असून पुणे लोकसभा निवडणुकीत चौरंगी लढत पाहण्यास मिळणार आहे. त्यामध्ये भाजपने माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना संधी दिली आहे. तर महाविकास आघाडीकडून आमदार रवींद्र धंगेकर, वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे, एमआयएम कडून माजी नगरसेवक अनिस सुंडके यांना उमेदवारी मिळाली आहे.

या चार ही उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात देखील झाली आहे. या निवडणुकीच्या काळात प्रत्येक उमेदवार आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर टीका करताना दिसत आहे. त्यातच काँग्रेस पक्षाचे पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी ‘एमआयएम’ने पुण्यात उमेदवार जाहीर केल्यानंतर एमआयएम या पक्षाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप केले आहेत.

त्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाचे पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की, पुणे लोकसभेचे भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांना पराभव दिसत आहे. त्यामुळे आता काही उमेदवार उभे केले जात आहे. त्याच दरम्यान, एमआयएमने अनिस सुंडके यांना उमेदवारी दिली आहे. एमआयएम या पक्षाला जो समाज मतदान करतो. त्या समाजातील नागरिकांना मागील काही निवडणुकीतील अनुभव पाहिल्यावर समजले आहे की, एमआयएमला मतदान केल्यावर भाजपचा उमेदवार निवडून येतो. आपल्या मतांचे विभाजन होते. म्हणून त्यांना भाजपाची बी टीम म्हणतात येईल.

## हातकणंगलेत चौरंगी लढत

**कोल्हापूर:** निवडणुकीत मतविभाजन करुन विजय मिळवणे, हा पर्यायही नेत्यांना आजमावून पाहतात. असाच प्रकार हातकणंगले लोकसभा मतदारसंघात करण्यात आलाय. हातकणंगले लोकसभा मतदारसंघात पाडापाडीच्या राजकारणाला वेग आलाय. ठाकरेंचे उमेदवार सत्यजित पाटील आणि शिंदेंच्या शिवसेनेचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या नावाशी साधर्म्य असणारे लोक शोधून त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आलं आहे.

## विदर्भातील पाचही उमेदवार विजयी होणार

### ■ नाना पटोले यांचा विश्वास

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

मोदी सरकारने जनतेचा भ्रम निराश केला आहे. जनतेला खोटी आश्वासने देऊन फसवले. नोकरी देण्याचे आश्वासन देऊन तरुणांना फसवले, शेतमालाला दीडपट भाव देणार, उत्पन्न दुप्पट करणार असे सांगून शेतकऱ्यांना फसवले, कामगारांना देशोधडीला लावले, महिलांना फसवले, त्यामुळे जनतेत मोदी सरकारविरोधात तीव्र संताप आहे. हा संताप प्रचारावेळी दिसून आला.



जनतेला लुटले व मुठभर धनदांडग्यांचे खिसे भरले याला विकास म्हणतात का, असा सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विदर्भात मतदान पार पडले. मतदानाचा हक्क बजावल्यानंतर नाना पटोले यांनी पत्रकारांशी बोलताना काँग्रेस विजयी होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विदर्भातील पाच मतदारसंघात मतदान झाले असून मविआच्या कार्यकर्त्यांचा उत्साह व मतदारांचा मोठा सहभाग पहायला मिळला. तरुण, शेतकरी, महिला व कामगार मोठ्या संख्येने मतदान करताना दिसले, अशी माहिती नाना पटोले यांनी दिली. दरम्यान, मोदी सरकारने १० वर्ष आपल्याला फसवेले ही भावना या वर्गात असून मोदी सरकारची १० वर्षांची हुकुमशाही या निवडणुकीत संपवण्याचा निर्धार जनतेने केलेला आहे, त्यामुळे भाजपाचा दारुण पराभव होणार हे अटळ आहे, असा दावा नाना पटोले यांनी केला.

## सखी केंद्रांनी वाढविला महिलांचा सन्मान

**। भंडारा । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात भंडारा -गोंदिया लोकसभा मतदार संघात ११ महिला मतदान केंद्राची विशेष सुविधा पुरविण्यात आली. महिलांचा सन्मान वाढविण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला. या मतदान केंद्रांचे सर्व प्रकारचे संचालन व व्यवस्थापन महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांभाळले. मतदान केंद्र सजविण्यात आले होते. आकर्षक कमानी उभारून महिलांचे स्वागत करण्यात आले. महिलांनी आनंदाने मतदान करीत मतदानाची निशाणी दाखविणारी सेल्फी घेत इतर महिलांना मतदानाचे संदेश पाठविले. तुमसर विधानसभा मतदार संघात




बोथली, वरठी, खैरलांजी, मेहगाव आदी सखी मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली. भंडारा विधानसभा मतदार संघात जि. प. शाळा वाही, ग्रामपंचायत कार्यालय खोकरला, सेंट पॉल स्कूल भंडारा येथे तर साकोली विधानसभा मतदार संघात विकास हायस्कूल पवनी, जिल्हा परिषद हायस्कूल लाखांदूर, समर्थ महाविद्यालय मुरमाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साकोली येथील केंद्रांचा सखी मतदान केंद्रात समावेश होता.

महिलांसाठी बैठक व थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होती. महिला कर्मचारी आनंदाने मतदानासाठी येणाऱ्या महिलांचे स्वागत करताना दिसून आल्या. सेल्फी पॉईंटची खास सुविधा उभारण्यात आली होती. त्यावर आम्ही भंडारावासी १०० टक्के मतदान करू, असे वाक्य ठळकपणे लिहले गेले होते. सेल्फी काउंटर फुग्यांनी सजविण्यात आले होते.

त्याचखाली ओ भाऊ मी मतदान करणार, तुम्ही पण मतदान करा, असे आवाहन करण्यात आले होते. मतदानावेळी असुविधा होऊ नये, याची विशेष खबरदारी घेतली जात होती. वृद्ध व दिव्यांगांना मदतीचा हातवृद्ध व दिव्यांगासाठी व्हिलचेअरची सुविधा देत मदतीचा हात पुढे केला जात होता. पोलिस कर्मचाऱ्यांचा व अन्य अधिकारी, कर्मचारी तैनातीला होते. वृद्ध, अपंगांनी मतदान केल्यानंतर आनंद व्यक्त केला. मतदार भारविल्याचे चित्र पहावयास मिळाले. त्यामुळे दिवसभर येथील मतदान केंद्राचे वातावरण उत्साहपूर्ण होते.

## भाजपच्या दबावामुळे राष्ट्रवादीत नाराजी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातला एक गट अजित पवार यांच्यावर नाराज असल्याची माहिती समोर येत आहे. काही लोकसभा म तदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये खमके उमेदवार असतानाही राष्ट्रवादी महायुतीसाठी जागा सोडल्या, यामुळे पक्षातील एक गट अजित पवारांवर नाराज असल्याचं समोर येत आहे. महातयुतीत भाजपच्या दबाबमुळे राष्ट्रवादी पक्षातील एक गट नाराज असल्याची माहिती आहे.अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे नाशिकसह परभणी, गडचिरोली, सातारा या लोकसभा मतदारसंघात सक्षम उमेदवार असताना देखील



शिवसेना आणि भाजपच्या दबावाला झुगारता न आल्यामुळे निवडून येणाऱ्या जागा हातातून गेल्याने नाराजीचा सूर या कार्यकर्त्यांमध्ये उमटत असल्याचं समोर आलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून केवळ स्वत:च्या पक्षातील दोन उमेदवार आणि इतर ठिकाणी उमेदवार आयात केल्याने आणि निवडून येणारे मतदार संघ सोडून इतर मतदारसंघ घेतल्याने राष्ट्रवादी अजित पवार गटातील एका गटाचं नाराजीचं वातावरण असल्याची माहिती आहे. नाशिक लोकसभेचा निर्णय तीन आठवडे घ्यायला विलंब लावल्याने या नाराजीत आणखी भर पडल्याची माहिती आहे. केंद्रीय पातळीवरून उमेदवारी जाहीर होऊन देखील राज्यातील नेत्यांच्या दबावाला झूगारता न आल्यामुळे नाशिकची निवडून येऊ शकेल, अशी जागा गम ावल्याची भावना या नेत्यांमध्ये असल्याची माहिती आहे. पक्षाच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच सातारा जिल्ह्यातून लोकसभेला घड्याळ चिन्ह हद्दपार गेल्यानेही नाराजी दिसून येत आहे.

वे|ध|क

# गीतेंनाच मिळणार सर्वसामान्यांचा कौल

## शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील यांचा विश्‍वास

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. जनसंवादातून त्यांना मतदारांसह कार्यकर्त्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. गीते यांच्यासाठी पोषक वातावरण आहे. त्यामुळे या निवडणुकीत सर्वसामान्यांचा कौल अनंत गीतेंनाच मिळणार असा विश्‍वास शेकाप अलिबाग तालुका चिटणीस अनिल पाटील यांनी विश्‍वास व्यक्त केला आहे.

आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांची काम करण्याची पध्दत खुप वेगळी असून समाजहित साधणारे व्यक्तीमत्व आहे. एक निष्ठावंत नेते म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी निर्माण केलेल्या शिवसेनेसोबत, उध्दव ठाकरे यांच्या मागे कायमच उभे राहिले आहेत. केंद्रात अनेक वर्ष खासदार,मंत्री असल्याने त्यांना प्रशासनाचा दांडगा अभ्यास आहे. अलिबाग तालुक्यात अनेक भागांमध्ये अनंत गीते यांच्या जनसंवाद बैठका झाल्या आहेत. या बैठकांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांना मिळत आहे. कार्यकर्ते उत्साहाने काम करीत आहेत.

शेतकरी कामगार पक्षाबरोबरच शिवसेना (उध्दव ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट) काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. गीतेंसाठी सध्याचे वातावरण अनुकूल आहे. रायगड जिल्ह्यातील मुरूड, अलिबाग, श्रीवर्धनसह अनेक तालुक्यात बैठका झाल्या. वेगवेगळ्या बैठकांमधून कार्यकर्ते, मतदार स्वयंस्फुर्तीने गीतेंना पाठींबा देत असल्याचे दिसून आले आहे.

बॅ. अंतुले यांनी तटकरे यांना राजकीय जन्म दिला. माजी आ. माणिक जगताप, मधूकर ठाकूर यांनीदेखील निवडणुकीत पाठींबा दिला आहे. त्यात शेतकरी कामगार पक्षानेदेखील प्रचंड मेहनत घेऊन मागील लोकसभा निवडणुकीत तटकरेंना निवडून दिले. मात्र ते कोणाचेच राहिले नाहीत . त्यामुळे या निवडणुकीत अनंत गीतेंनाच जनतेचा कौल मिळणार आहे, असा विश्‍वास शेकाप अलिबाग तालुका चिटणीस अनिल पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# मावळमध्ये बारणेंकडून विकासशून्य कारभार

## संजोग वाघेरे पाटील यांचा आरोप



। नेरळ । प्रतिनिधी ।

मावळमधील संसदरत्न म्हणून मिरवणारे खासदार यांनी दहा वर्षात कोणती कामे केली हे मी उमेदवार म्हणून विचारत नाही. तर मतदारसंघातील जनता विचारत असून साधे पाणी घरोघरी देऊ शकले नाहीत आणि त्यामुळे कर्जत तालुक्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. श्रीरंग बारणे यांच्या कार्यकाळात मावळ मतदारसंघात विकासशून्य कारभार असल्याचा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी मांडले.

मावळ लोकसभा निवडणुकीचे दृष्टीने महाविकास आघाडीची उम रोली आणि नेरळ जिल्हा परिषद गटाची कार्यकर्ता आढावा बैठक डिकसळ येथील रोहित मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आले होती.

यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश टोकरे, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उप जिल्हा प्रमुख नितीन सावंत,महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी, कम्युनिस्ट पक्षाचे प्रदेश प्रतिनिधी अ‍ॅड. गोपाळ शेळके, शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, शेकाप तालुका चिटणीस श्रीराम राणे,राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष संजय गवळी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष शंकर भुसारी, काँग्रेसचे दीनानाथ देशमुख तसेच उपजिल्हा प्रमुख दशरथ भगत, सुरेश गोमारे, माजी सभापती वासंती राणे,युवा सेना तालुका अध्यक्ष प्रथमेश मोरे, काँग्रेस डॉक्टर सेल जिल्हा अध्यक्ष डॉ. संतोष सदावर्ते यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

# माथेरानसाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेणार

## संजोग वाघेरे पाटील यांचे आश्‍वासन

## महाविकास आघाडी आढावा बैठक संपन्न

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरात अनेक बंधने असून पर्यावरण नियम पाळून येथील विकास साधण्यासाठी आपण कालबध्द कार्यक्रम हाती घेणार असल्याचे आश्‍वासन मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी दिले. माथेरानमध्ये महाविकास आघाडीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी वाघेरे पाटील बोलत होते.

माथेरानमधील प्रीती हॉटेलमध्ये आयोजित आढावा बैठकीत व्यासपीठावर महाविकास आघाडीचे उमेदवार संज्योग वाघेरे पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा प्रमुख सुरेश टोकरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा नितीन सावंत,शिवसेना तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी, शेकाप तालुका अध्यक्ष श्रीराम राणे, माजी नगराध्यक्ष विवेक चौधरी, प्रेरणा सावंत, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष संजय गवळी आदी मान्यवर उपस्थित होते. महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे




पाटील यांच्या प्रचारार्थ आढावा बैठकीचे प्रास्ताविक शिवसेना ठाकरे गटाचे माजी शहर प्रमुख प्रसाद सावंत यांनी केले. त्यावेळी त्यांनी नेरळ माथेरान मिनी ट्रेन मार्गाचे विद्युतीकरण करण्यात यावे आणि जेणेकरून या मार्गावर गाड्यांची संख्या वाढावी अशी मागणी केली. माथेरानमध्ये येण्यासाठी पर्यायी मार्ग बनवावा तसेच जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होत असल्याने त्याबाबत उपाययोजना करण्यात यावी अशी सूचना केली.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी यावेळी बोलताना माथेरानचे आणि माझे २५ वर्षाचे नाते आहे. त्यातून माथेरानबाबत जिव्हाळा निर्माण झाला आहे. माथेरानमधील समस्या सोडविण्यासाठी माझा कायम प्रयत्न राहिला आहे. माणसाची काम करण्याची धडपड ही पक्ष विरहित मैत्री राहिली आहे. शहरात येण्यासाठी पर्यायी रस्ता होण्यासाठी माझा प्रामुख्याने प्रयत्न राहील आणि वर्षभरात पूर्ण करण्याचे आश्‍वासन दिले. माथेरानमधील जमिनीची धूप थांबविण्यासाठी पर्यावरण संस्था यांच्यासोबत चर्चा करून मार्ग काढण्याचे आश्‍वासन दिले. तर माथेरान रोप वे चे काम कागदोपत्री कुठे अडकले आहे याचा अभ्यास केला जाईल आणि हा महत्वाचा प्रकल्प मार्गी लावला जाईल, असे आश्‍वासन दिले.

उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांनी यावेळी बोलताना आपण शिवसैनिक आपला पक्ष फुटल्यानंतर अहोरात्र मेहनत घेतलेली आहे.त्यामुळे आता आणखी महिना मशाल चिन्ह घरोघरी पोहचवण्याचे ध्येय महाविकास आघाडीने ठेवले आहे असे आश्‍वासन लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार वाघेरे पाटील यांना दिले. शिवसेना ठाकरे गटाच्या महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी यांनी माथेरानमध्ये आरपीआय महाविकास आघाडीसोबत आहेत. ही आमच्या उमेदवार वाघेरे पाटील यांच्यासाठी जमेची आणि खासदार होण्याचे दृष्टीने महत्वाची बाब आहे, असा विश्‍वास व्यक्त केला.

शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख कुलदीप जाधव, काँग्रेस शहर अध्यक्ष विजय कदम, शेकाप शहर चिटणीस उमेश कदम, आरपीआय माथेरान शहर अध्यक्ष अनिल गायकवाड, मनीषा शिंदे, युवासेना शहर अधिकारी निमेश मेहता यांनी उपस्थित लोकांचे स्वागत केले. तर माथेरान शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष झाल्याबद्दल माजी नगरसेवक शकील शेख यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. शेकापचे ज्येष्ठ नेते पुंडलिक शिनारे यांनी यावेळी बोलताना शेतकरी कामगार पक्षाने माथेरानमधॅल राजकारण अनेक वर्षे पाहिले आहे. ही लढाई कुरुक्षेत्राची लढाई आहे. कौरवांचा पराभव करण्यासाठी आपण सर्वांनी स्वतः संजोग वाघेरे पाटील आहोत अशाप्रकारे मतदारापर्यंत पोहचावे अशी सूचना पुंडलिक शिनारे केली. श्रीराम राणे यांनी पाच पक्षांचे कार्यकर्त्यांनी आत्मविश्‍वासाने आणि जमिनीवर राहून आपल्या उमेदवाराला विजयी करायचे आहे, असे मत मांडले. आदिवासी सेवाभावी संघटनेचे अध्यक्ष जैतू पारधी यांनी आपल्या संघटनेचे वतीने महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील आणि आघाडीला यांना जाहीर पाठिंबा दिला.

# शिवसेना महिला आघाडी संघटीकापदी सुजाता पाटील

। रसायनी । वार्ताहर ।

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने जिल्हासंपर्कनेत्या किशोरी पेडणेकर व जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा संघटिका ममता पाटील यांनी उरण तालुक्याच्या जसखार गावातील शिवसेनेच्या महिला कार्यकर्त्या सुजाता संतोष पाटील यांची नवघर विभागासाठी महिला आघाडी उपतालुका संघटीकापदी नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी माजी आमदार मनोहर भोईर यांनी सुजाता पाटील यांचे अभिनंदन केले. उरण तालुक्यातील नवघर विभागात महिला आघाडी बांधणीसाठी मोलाचे योगदान द्यावे असे आवाहन केले.

यावेळी उपजिल्हाप्रमुख नरेश



रहाळकर, महिला आघाडी उपजिल्हा संघटिका ममता पाटील, उपतालुकाप्रमुख जयवंत पाटील, उपतालुका संघटक के एम घरत, केगाव विभाग प्रमुख एस.के.पुरो, माजी शहर संघटक महेश वर्तक, उरण शहर संपर्क संघटिका वंदना पवार , वशेणी सरपंच अनामिका म्हात्रे, अल्पसंख्यांक सेलच्या उरण तालुका अध्यक्ष हुसेना शेख, शाखा संघटिका हसीमा सरदार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# निवडणूक निरीक्षकांनी घेतला कामकाजाचा आढावा

। रायगड । प्रतिनिधी ।

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ३२- रायगड लोकसभा मतदारसंघासाठी सामान्य निवडणूक निरीक्षक, कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक आणि खर्च निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. आज सामान्य निवडणूक निरीक्षक संजीवकुमार झा आणि निवडणूक पोलीस निरीक्षक जोयस लालरेम्मवी यांनी मतदार संघातील निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला.

राजस्व सभागृह येथे निवडणुकीशी संबंधित सर्व यंत्रणा तसेच नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक झा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक जोयस लालरेम्मवी, पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, ज्योस्त्ना पडियार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के आदी उपस्थित होते.

संजीवकुमार झा म्हणाले, सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी निवडणूक प्रक्रियेत आपली जबाबदारी उत्कृष्टपणे हाताळावी. पारदर्शकपणे सर्व प्रक्रिया पार पाडावी. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार सर्वांनी कार्यवाही आणि कारवाई करावी असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. यावेळी संजीवकुमार झा यांनी एकूण जिल्ह्याचा आढावा, मतदान प्रक्रियेमध्ये असलेले मनुष्यबळ व्यवस्थापन,अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, साहित्य व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, मतदान यंत्र सुरक्षा व व्यवस्थापन, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक खर्च व्यवस्थापन, मतपत्रिका, पोस्टल बॅलेट, मतदार मदत केंद्र, तक्रार निवारण केंद्र, सी व्हीजील ॲप, ८५ वर्षांवरील व्यक्तींना तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असलेल्या व्यक्तींना गृहमतदानाची सुविधा, मिडीया सेल आदींबाबत आढावा घेतला. मतदार संघातील सर्व निवडणूक यंत्रणाच्या कामाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

पोलीस निरीक्षक जोयस यांनी कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्हा प्रशासनाने निवडणूक तयारीबाबत माहिती दिली. पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला.बैठकीला सर्व नोडल अधिकारी व विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते. यावेळी संजीवकुमार झा आणि जोयस लालरेम्मवी यांनी कंट्रोल रूम आणि मीडिया सेलला भेट देऊन तेथील काम काजची पाहणी केली आणि कामकाजाचा आढावा घेतला.

# पनवेल : पोलिसांचे ‘ऑपरेशन ऑल आऊट’

। पनवेल । वार्ताहर ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्‍वभूमीवरती पनवेल तालुका पोलिसांनी राबवले हद्दीमध्ये ‘ऑपरेशन ऑल आऊट’ राबवून मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे.



पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील, पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर आदींच्या उपस्थिती मध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणी ऑपरेशन ऑल आऊट राबवून त्यामध्ये प्रामुख्याने अंमली पदार्थ विरूद्ध कारवाई, अंमली पदार्थाचे सेवन करणारे ०२ इसमांवर कारवाई, एक लोखंडी धारदार घातक शस्त्र जप्त, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५(ई) अन्वये एकूण ०९ गुन्हे दाखल करून देशी, विदेशी व हातभट्टी दारू जप्त केली आहे, त्याचप्रमाणे कोपटा ॲक्ट अंतगर्त १७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे, त्याचप्रमाणे बार वर कारवाई करून ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच हद्दीतील गुंडांची तपासणी, केली असता हिस्ट्रीशिटर ०३ पैकी ०३ मिळून आले त्याचप्रमाणे गुंडा रजिस्टरमधील १९ पैकी १० मिळून आले आहेत तसेच प्रतिबंधक कारवाई सुद्धा करण्यात आल्या आहेत, त्याचप्रमाणे हद्दीकडे दोन ठिकाणी नाकाबंदी करून ३१ वाहनांवर मोटर वाहन कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईमध्ये सात सहाय्यक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, ५७ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे नेते उरण दौऱ्यावर

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल व उरण तालुक्याचा दौरा केला व त्यामध्ये पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांशी आगामी लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचारा विषयी चर्चा केली. स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष सागर संसारे यांनी राज्य पातळीवर महाविकास आघाडीशी युती केलेली आहे. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांशी चर्चा होत नाही तोपर्यंत कार्यकर्ते प्रचारात सहभागी होणार नाहीत असा निर्णय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेतला आहे.

# पीएनपी होली चाईल्ड सीबीएसईमध्ये रंगला आगळा वेगळा कार्यक्रम




। अलिबाग । प्रतिनिधी ।

पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई शाळेमध्ये विद्यार्थी मतदान हा आगळा-वेगळा उपक्रम संकुलाच्या प्रांगणात १९ एप्रिल रोजी उत्स्फूर्तपणे पार पडला. शाळेतील विविध विभागांतर्गत हे मतदान घेण्यात आहे. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी मतदान प्रक्रियेत भाग घेतला. मतदान प्रक्रियेमधून निवडून आलेल्यांची स्कूल कॅप्टन, स्कूल व्हाईस कॅप्टन, हाऊस कॅप्टन (ब्लू हाऊस, ग्रीन हाऊस, रेड हाऊस व यलो हाऊस) या पदांवर नेमणूक करण्यात आली.

या प्रक्रियेमध्ये मतदान कसे केले जाते याविषयी माहिती मि ळाली. सर्व मुलांनी मतदान प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मुलांना मतदान प्रक्रियेचे ज्ञान व महत्त्व अवगत झाले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहित करण्यासाठी अलिबाग तालुक्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी मधुरा शेलार, सहाय्यक पोलीस अधिकारी भारत फार्णे, होली चाईल्ड सी.बी. एस.ई. शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाझकर तसेच अकॅडमी डायरेक्टर श्रुती सुतार, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी उपस्थिती दर्शवली.

मतदान प्रक्रियेमधून निवडून आलेल्या स्कूल कॅप्टन, स्कूल व्हाईस कॅप्टन, हाऊस कॅप्टन यांनी शपथविधीनंतर आपापल्या पदाचा कार्यभार स्वीकारला तसेच नर्सरी ते १० वी च्या वर्गाचे प्री फेट यांनाही सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रत्येक वर्गाचे पालक प्रतिनिधी यांना सन्मानित करण्यात आले. वरिष्ठ पोलीस अधिकारी मधुरा शेलार, सहाय्यक पोलीस अधिकारी भारत फार्णे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्रीडा प्रशिक्षक अक्षय डाकी यांच्या मार्गदर्शना खाली मुलांनी संचलन व पिऱ्यामिडचे अत्यंत सुंदर सादरीकरण केले.

# मतदान जनजागृती प्रचार रॅली

। माणगाव । वार्ताहर ।

रायगड लोकसभा निवडणुकीसंदर्भात जनजागृती म्हणून प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजाविला पाहिजे.याबाबतची जनजागृती म्हणून माणगांव नगरपंचायत व विवा कॉलेज माणगाव यांच्या तर्फे मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या मतदान जनजागृती प्रचार प्रसिद्धी रॅलीत माणगाव




नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी, नायब तहसिलदार प्रभाळे, नगरपंचायतीचे कर्मचारी अतुल जाधव, विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे, उप प्राचार्य योगेश रानभरे, प्राध्यापक प्रतीक नागरगोजे, कर्मचारी, सफाई कामगार आणि कॉलेज विद्यार्थी उपस्थित होते.

# रश्मी तांबे यांचा शिवसेनेत प्रवेश

। म्हसळा । वार्ताहर ।

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) महिला तालुका अध्यक्ष रश्मी तांबे यांनी आपल्या कार्यकर्त्यां समवेत दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवगणे यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

यावेळी उपजिल्हा प्रमुख नंदू शिर्के, जिल्हा महिला संघटिका स्वीटी गिरासे, तालुका प्रमुख सुरेश



कुडेकर, नगरसेविका राखी करंबे, बाळा म्हात्रे, राजाराम तिलटकर, सुजित येल्वे, अतिक उकये, रीमा महामुनकर, शहरप्रमुख विशाल सायकर, अजय करंबे, मुबशीर हर्जुक, राजेंद्र मोहिते, पांडुरंग बने आणी शिवसैनिक उपस्थित होते.

रायगड लोकसभेचे शिवसेना उमेदवार अनंत गीते यांना विजयी करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करणार असल्याचे रश्मी तांबे यांनी यावेळी सांगितले.

# लोकशाही सुदृढ करण्यात हातभार लावा

## साईनाथ पवार यांचे आवाहन

। रायगड । प्रतिनिधी ।

मतदान हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. दिव्यांगांनी मतदान करून लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी सकारात्मक पाऊल उचलायला हवे. दिव्यांग मतदारांनी मतदानाच्यावेळी कोणत्याही अमि षाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे व लोकशाही सुदृढ करण्यात हातभार लावावा, असे आवाहन महाराष्ट्र अपंग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष साईनाथ पवार यांनी केले.

चणेरा विभागातील कुणबी समाज मंदिर येथे रोहा तहसील कार्यालय आणि सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था यांच्या संयुक्त



विद्यमाने दिव्यांग मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी साईनाथ पवार बोलत होते.

या कार्यक्रमाला रोहा तालुका नायब तहसीलदार अंधारे, अपंग कल्याणकारी संस्थेचे सचिव शिवाजी पाटील चणेरा विभाग प्रमुख प्रवीण मोरे, गोरख बाबरे, जयेश ठाकूर, तेजश्री मोरे, दीपक मोरे, विशाल चोरगे , बाळासाहेब थोरात, अभिजीत महाडिक, पोलीस पाटील रहूप आदी उपस्थित होते.

निवडणूक विभागाने दिव्यांगाना घरून मतदान करण्याची सोय, मतदान केंद्रावर व्हीलचेअरची व्यवस्था, रॅम रेलिंग तसेच दिव्यांगांना मदतनीसाची सोय इत्यादी सुविधा दिल्या आहेत. लोकसभा निवडणूक लोकशाहीचा उत्सव आहे. या उत्सवात दिव्यांग मतदारांबरोबर अन्य मतदारांनी सहभाग नोदवावा. दिव्यांग मतदारांनीदेखील मतदान प्रक्रियेत सहभाग दाखवून समाजासमोर आदर्श ठेवावा असे साईनाथ पवार यांनी सांगितले.

**मतदानापासून दिव्यांग मतदारही वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोगाने जोरदार तयारी केली आहे. दिव्यांगांना व्हीलचेअर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच विविध उपाययोजना केल्या जाणार आहेत. दिव्यांग व्यक्तींना मतदान प्रक्रिया सहजसुलभ व्हावी, त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग मोठ्या संख्येने वाढावा. याकरीता भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार त्यांना आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या आहेत. मतदारसंघनिहाय दिव्यांग मतदारांची माहिती उपलब्ध करून ठेवावी, त्यानुसार त्यांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी वाहन व्यवस्था, मतदान केंद्रावर रॅम्प, पिण्याचे पाणी, मदत कक्ष आदी व्यवस्थेसह दिव्यांग मतदारांना मतदानाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांना मतदान करणे सुलभ होईल याकडे लक्ष द्यावे अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भरत मुंगळे व आभार कोतवाल रवी शिंदे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता मतदान करण्याची प्रतिज्ञा घेऊन करण्यात आली.**

# राष्ट्रीय कार्यासाठी मतदान करा

## मुरूड तहसीलदार रोहन शिंदे यांचे आवाहन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मुरूड तहसीलदार रोहन शिंदे यांनी मुरुड तालुक्यातील आदिवासी वाड्यांवर व विविध ठिकाणी जाऊन मतदान आपला अधिकार सुदृढ लोकशाहीसाठी मतदान हा महत्त्वाचा घटक असुन नवमतदारांनी यांचे साक्षीदार व्हावे तसेच मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करावे, असे आवाहन मुरूड तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले.



यावेळी तलाठी, मंडळ अधिकारी यांनी निवडणुकीचे महत्व, मतदानाची जबाबदारी, युवा मतदारांचे कर्तव्य, निवडणूक प्रक्रिया आदींबाबत आदिवासी महिला पुरुष व युवकांशी संवाद साधला मतदान वोटर गाईडचे वाटप मतदारांना मतदार माहिती, यामध्ये मतदारांचे नाव,भाग क्रमांक, खोली क्रमांक आदि आवश्यक माहिती असते. आदिवासी वाड्यांवर मतदारांना वोटर गाईडचे वाटप केले. म तदान ही प्रत्येकांची जबाबदारी असून येत्या ७ मे रोजी आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन यावेळी मुरूड तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यांस येते की तलाठी सजा हमरापुर हद्दीतील मौजे खारसापोली, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. जगन्नाथ परशुराम म्हात्रे यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./ हि. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| खारसापोली | ४८/९ | ०.३७.००<br>पो.ख. ०.०२.००<br>एकुण क्षेत्र ०.३९.०० | ०.६६ |

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिप:- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण:- पेण  
दि :- २०/०४/२०२४  
सही/-  
**ॲड हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**  
साई श्रद्धा सबुरी बिल्डिंग बी-विंग,  
ब्लॉक नं. ००२, प्रभु आळी, पेण

**महसूल व वन विभाग**  
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण,माणगांव यांचे कार्यालय**  
**कचेरी रोड, माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड**  
Email ID : altmangaon@gmail.com

**जाहिर नोटीस**

प्रति, दावा क्रमांक: २४/२०२४  
१.श्री. सिताराम महादु शिंदे  
२. श्री. लक्ष्मण महादु शिंदे  
३. श्री. गणपत महादु शिंदे  
४. श्रीमती अनिता अनंत पवार  
५. श्रीमती. अल्पा अमर पवार  
६. श्री. गंगाराम महादु शिंदे (मयत)  
७. श्री. तुषार गंगाराम शिंदे — वादी  
८. श्रीमती. निशा नंदकुमार मढवी  
९. रसिका राजेंद्र भोनकर  
१०. श्रीमती. विठा बाळाराम उभारे  
११. श्रीमती. शारदा गंगाराम शिंदे  
१२.श्रीमती. शिल्पा भैरू पडवळकर  
१३. श्रीमती. सुनिता काशिराम खडतर  
सर्व रा. सुरव तर्फे तळे, ता. माणगांव, जि. रायगड

**विरुध्द**

१. श्री. अनंत शांताराम वेदपाठक — प्रतीवादी  
रा. मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवुन मिळण्यासाठी न्यायधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक १०/०५/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वतःवकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजु मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचुन नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवुन न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसुची**

| गाव | गट नं/स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| सुरव तर्फे तळे ता.माणगाव | ६६४ | ३ | ०-३८-०० | ३-६५ |

ठिकाण -माणगांव  
दिनांक : -१९/०४/२०२४  
सही/-  
**(विकास गारूडकर )**  
अपर तहसिलदार व  
शेतजमिन न्यायाधिकरण, माणगांव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**  
**मिळकतीचे वर्णन :-**  
**१) मौजे - सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) अभिषेक विजय कर्णूक | ४९ | ११ | ०-१६-४० | ० | १७ |
| २ )नरेश गणेशलाल प्रजापत | ४९ | ६ | ०-०४-०० | ० | ३ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.  
कार्यालयीन पत्ता:- फ्लॅट नं. ४, ए विंग, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.  
सही / -  
ॲड. जयेश संभाजी म्हसे  
दिनांक :- २१/०४/२०२४  
मो.नं. ९०२८९८२२७७  
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-किकवी, ता.कर्जत जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**  
**मौजे-किकवी, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री.हरेश गोटीराम घोडविंदे | १४१/३/अ/२ | ०.५६.२०<br>पोट खराबा ०.०५.४०<br>एकूण ०.६१.६० | ४.०१ |
| यापैकी विक्री केलेले क्षेत्र ०.३०.०० हे.आर.पॉ. (गुंठे) | | | |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

त्याअर्थी विद्यमानन मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु.हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक **-श्री. हरेश गोटीराम घोडविंदे** यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन मालकी हक्काचे प्रमाणपत्र व ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत  
दिनांक : २१/०४/२०२४  
सही/-  
**ॲडव्होकेट.मिनाक्षी जगन्नाथ भासे**  
पत्ता-शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्,  
मुद्रे(बुद्रुक),ता.कर्जत,जि.रायगड४१०२०१.  
मो.नं.७४१०१४८१२१/७७९८१५११८८  
minakshibhase@gmail.com

## change in Name

My son's name is Preet Prashant Narvekar, his name is spelled as Preet on his Aadhaar card and other documents. But his name is misspelled as prit on his passport. I have made notary affidavit no.112/2020 dated 20/04/2024 to correct the mistake in the spelling of the name on the passport. However, my son's name is spelled as preet, not prit. Everyone should note this.

## जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. आप्पा देहू माळी यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**  
**मौजे मार्केवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २९ /२/ ब एकुण ०.८५.२० गुंठे जागा पैकी ०.२६.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनाक २१/०४/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**  
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड  
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. सावित्री प्रकाश घरत व सौ. प्रियांका हेमंत पाटील रा. जासई, तालुका- उरण, जिल्हा रायगड व सरोजा शंकरकुमार पडवाला रा. आमलापुरम, आंध्रप्रदेश यांनी खालील वर्णनांची पडजमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक सुरेखा रंजन आवास्कर रा. पेण- रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

मिळकतीचे वर्णन - जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील तलाठी सजा- धामणी, मौजे वरवणे आदिवासीवाडी येथील गट क्र. ४४ क्षेत्र ०-२१-०० आर.चौ.मी. आकार रु. ०-१३ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिनी संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाले दिवशी पासून १५ (पंधरा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची पडजमिन ही निर्वेध व बोजा विरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांबर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण- रायगड.  
दि. २१/०४/२०२४.  
सही/-  
**ॲड. संजय भास्कर पाटील.**  
परमार प्लाझा, शॉप नं. १६.  
तळ मजला, शिवाजी पथ,  
पेण- रायगड. ४०२१०७.  
मोबा. ९८८१९१५२१९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,
आमचे अशिलानी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत श्री.विश्वनाथ गोटीराम घोडविंदे यांचेकडून कायमस्वरूपी रोड वहिवाटीच्या करारनाम्याचे घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**  
**मौजे-किकवी, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| १४०/३ | ०.३४.५० | ०.२८ |
| यापैकी रोड वहिवाटीकरीता दिलेले क्षेत्र ०.०३.०० हे.आर.पॉ. (गुंठे) | | |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

तरी सदर जमिन मिळकतीत अथवा सदर जमिन मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती आणि त्याच्या हरकती नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर जमिन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर जमिन मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २१/०४/२०२४  
ठिकाण : कर्जत  
सही/-  
**ॲडव्होकेट.मिनाक्षी जगन्नाथ भासे**  
पत्ता-शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्,  
मुद्रे(बुद्रुक),ता.कर्जत,जि.रायगड ४१०२०१.  
मो.नं.७४१०१४८१२१/७७९८१५११८८  
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १ ) प्रमोदिनी हरिचंद्र पाटील २) प्रसाद हरिचंद्र पाटील, ३) कला हरिश्चंद्र पाटील, ४) निहा अनिस राऊत, ५) राजश्री प्रदिप घरत, ६) तनुजा अविनाश म्हात्रे, ७)महेश हरिश्चंद्र पाटील रा. मु.पो. ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवले असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे आर. पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| सहाण ता. अलिबाग | १२१ | ०-३६-१०<br>पो.ख. ०-०५-००<br>एकूण ० ४१-१० | ९.१२ |
| सदर वर नमूद केलेली शेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे. | | | |

सदर मिळकती बाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग  
तारीख २१/०४ /२०२४  
सही/-  
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**  
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर  
पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे दत्तपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक जयश्री गजानन पाटील वगैरे-३ यांच्या खुद्द मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झाली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| दत्तपाडा ता. अलिबाग | ३५ | | ०-४७-५०<br>पो.ख.०-०१-५०<br>एकूण ०-४९-०० | ३.८७ |
| वर नमूद मिळकती पैकी ०-०६-८७ हे.आर. ही मिळकत. | | | | |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशि लांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०४/२०२४  
सही/-  
**ॲड. विवेक रमेश साळवी**  
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,  
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलानी, मौजे आगरसुरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील, गट नं. १८१ (जुना सर्व्हे नं. २०/१) खराब्यासह एकुण क्षेत्र ०-१७-० (हे. आर. पॉ.) आकार ३.५५ (रू.पै.) हि मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालक संगीता नथुराम म्हात्रे, राहणार आगरसुरे, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेण्याविषयी ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या मिळकतींचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, भाडेकरू अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची कोणतीही हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास त्यांनी तो आमचे अशिलाचे लाभात सोडून दिलेला आहे व मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,  
दिनांक: २१/०४/२०२४  
**(ॲड. महेश एकनाथ घरत)**  
'गुरूकृपा' मु.पो. खंडाळे,  
ता. अलिबाग, जि. रायगड  
मो.नं. ९८२२६३५५१२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलानी, मौजे आगरसुरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील, गट नं. २९० (जुना सर्व्हे नं. १९/३) खराब्यासह एकुण क्षेत्र ०-३९-० (हे. आर. पॉ.) आकार ०.४५ (रू.पै.) हि मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालक संगीता नथुराम म्हात्रे, राहणार आगरसुरे, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेण्याविषयी ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या मिळकतींचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, भाडेकरू अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची कोणतीही हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास त्यांनी तो आमचे अशिलाचे लाभात सोडून दिलेला आहे व मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,  
दिनांक: २१/०४/२०२४  
**(ॲड. महेश एकनाथ घरत)**  
'गुरूकृपा' मु.पो. खंडाळे,  
ता. अलिबाग, जि. रायगड  
मो.नं. ९८२२६३५५१२


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १ ) प्रमोदिनी हरिचंद्र पाटील २) प्रसाद हरिचंद्र पाटील, ३) कला हरिश्चंद्र पाटील, ४) निहा अनिस राऊत, ५) राजश्री प्रदिप घरत, ६) तनुजा अविनाश म्हात्रे, ७)महेश हरिश्चंद्र पाटील रा. मु.पो. ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवले असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे आर. पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| सहाण ता.अलिबाग | १२१ | ०-३६-१०<br>पो.ख. ०-०५-००<br>एकूण ० ४१-१० | ९.१२ |
| सदर वर नमूद केलेली शेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे. | | | |

सदर मिळकती बाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग  
तारीख २१/०४ / २०२४  
सही/-  
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**  
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर  
पो.अलिबाग ता.अलिबाग जि. रायगड.


## जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. मनोज पुरुषोत्तम भद्रा, श्रीमती.गीता पुरुषोत्तम भद्रा यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**  
**मौजे पुलाचीवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २४/२/अ/ १ एकुण ०.४०.०० गुंठे जागा व सर्व्हे नं २४/२/अ/२ एकुण ०.४०.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा,बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनाक २१/०४/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**  
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड  
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलानी, मौजे आगरसुरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील, गट नं. २८९ (जुना सर्व्हे नं. १९/२अ) खराब्यासह एकुण क्षेत्र ०-२८-० (हे. आर. पॉ.) आकार ०.३५ (रू.पै.) हि मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालक संगीता नथुराम म्हात्रे, राहणार आगरसुरे, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेण्याविषयी ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या मिळकतींचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, भाडेकरू अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची कोणतीही हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास त्यांनी तो आमचे अशिलाचे लाभात सोडून दिलेला आहे व मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,  
दिनांक: २१/०४/२०२४  
**(ॲड. महेश एकनाथ घरत)**  
'गुरूकृपा' मु.पो. खंडाळे,  
ता. अलिबाग, जि. रायगड  
मो.नं. ९८२२६३५५१२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे नांदईपाडा, ता. अलिबाग येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. कबीर सुरेश सत्यानी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| नांदईपाडा | ४१/१ | ०-२०-४०<br>पो. ख. ०-०१-६०<br>०-२२-०० | ३.७९ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग  
ता. २१/०४/२०२४  
**ॲड. विधान अरविंद पाटील**  
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,  
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड  
मो. नं. ९४२२३७५११५


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

■ बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९

■ शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९

■ उजाला विवाह मंडळ, मुंबई उजाला ज्योतिष क्लासेस, रायगड Mob No.: 9324987050

■ अलिबागमध्ये ब्लॉक व दुकानाचे गाळे भाड्याने देणे आहे. संपर्क : मोबाईल ९८२२०३१०१७/९०२८५६५९१७

■ अलिबाग येथे मोठा फ्लॅट (2BHK) विकणे आहे. किंमत रूपये ७४ लाख (Negotiable) ८२७५११९८८३

■ इलेक्ट्रिकल (वायरिंग) कामासाठी (हेल्पर) गरजू मुलांची गरज आहे. ९२७०६१४०७७ (चेंढरे-गोंधळपाडा)

■ 175 sq.ft दुकान गाळा, भाड्याने देणे आहे बे-वूड्स कॉम्प्लेक्स, गोंधळपाडा, अलिबाग ८८०५०२२३२०/८८०६३३१०००

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

■ शिवाजी पेटशॉप अलिबाग येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

(पान १ वरुन)

## खासदार होण्याचे स्वप्न धुळीला

सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रांची छाननी प्रक्रिया पार पडली. रायगड लोकसभा मतदारसंघात खऱ्या अर्थाने इंडिया आघाडीचे शिवसनेचे अनंत गीते आणि महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांच्यामध्येच लढत होणार आहे. मतदानाची तारीख जशी जवळ येत आहे, तसा प्रचार शिगेला पोहोचत आहे. मतदारसंघामध्ये इंडिया आघाडीने प्रचाराचा चांगलाच धुरळा उडवून दिला आहे. तसेच महायुतीनेही प्रचारात रंगत आणल्याने राजकीय रणांरण चांगलेच तापले आहे.

लोकसभा निवडणुकीत राजकीय नशीब अजमावण्यासाठी हवश-नवशे-गवशे सगळेच उतरले आहेत. तब्बल २८ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. शनिवारी अर्जाची छाननी प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये सात उमेदवारांचे १३ अर्ज बाद ठरवण्यात आले आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

अनिकेत तटकरे हे पर्यायी उमेदवार असल्याने त्यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यात आला. त्यांनी एकच सूचक दिला होता. नियमाप्रमाणे त्यांनी सूचक दिले असते, तर त्यांचा अर्ज वैध ठरला असता. अन्य उमेदवारांनी सादर केलेले प्रतिज्ञापत्र अपूर्ण असणे, विहीत नमुन्यात नसणे, या कारणांनी त्यांचे अर्ज बाद ठरवण्यात आले आहेत.

### २१ अर्ज वैध

**सुनिल दत्तात्रेय तटकरे (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी), गोपाळ यशवंतराव तंतरपाळे (अपक्ष), विजय गोपाळ बना (अपक्ष), सुनिल दत्ताराम तटकरी (अपक्ष), निवास सत्यनारायण मट्टपरती (अपक्ष), अभिजित अजित कडवे (अपक्ष), अजय यशवंत उपाध्ये (अपक्ष), अस्मिता एकनाथ उंदिरे (अपक्ष), अंजली अश्विन केळकर (अपक्ष), अमित श्रीपाल कवाडे (अपक्ष), मिलिंद काशिनाथ कांबळे (बहुजन समाज पार्टी आंबेडकर), नंदकुमार गोपाळ रघुवीर (लोकराज्य पार्टी), कुमोदिनी रवींद्र चव्हाण (वंचित बहुजन आघाडी)**

## आत्मघातकी निर्णय

समजताच मी त्यांची नुकतीच भेट घेतली. या विषयवार त्यांच्यासोबत चर्चा केली. मात्र, त्यांनी कौटुंबिक कारण सांगितले. तटकरे यांच्या दुटप्पी आणि फसव्या वृत्तीमुळे बॅ. अंतुले यांनी शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना आपल्यापासून दूर ठेवले. त्यामुळे मुश्ताक अंतुले यांचा राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय अत्यंत चुकीचा ठरणार असल्याकडे घरत यांनी लक्ष वेधले.

## फौजदारी न्याय व्यवस्थेत बदलांसाठी देश सज्ज

आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता हेही उपस्थित होते. नवीन कायद्यांनी भारताच्या कायदेशीर चौकटीला फौजदारी न्यायाच्या संदर्भात नवीन युगात बदलले आहे. नागरिक म्हणून आपण ते स्वीकारले तरच नवीन कायदे यशस्वी होतील. नव्याने लागू करण्यात आलेल्या कायद्यांमुळे फौजदारी न्यायविषयक भारताच्या कायदेशीर चौकटीचे एका नव्या युगात रूपांतर झाले आहे, असे डीवाय चंद्रचूड यांनी स्पष्ट केले.चंद्रचूड म्हणाले, पीडितांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि गुन्ह्यांचा तपास आणि खटला चालवण्यात कार्यक्षमता सुधारण्यासाठी तातडीच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. संसदेने हे कायदे मंजूर करणे हे स्पष्ट संकेत आहे की भारत बदलत आहे आणि प्रगती करत आहे.

**नागरिकांनी सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची संधी गमावू नये, संविधानिक लोकशाहीत हे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य आहे. - सरन्यायाधीश चंद्रचूड**

## महिलांमध्ये धक्काबुक्की

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

खारघरमधील शिवशंकर टॉवर इमारतीमध्ये पार्किंगच्या मुद्द्यावरून महिलांमध्ये वाद झाल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. बांधकाम व्यावसायिकाच्या काही महिलांनी रहिवासी महिलांना धक्काबुक्की करत जोरजोरात भांडण करत असल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे. बांधकाम व्यावसायिकाने महिला बाऊन्सर यांना बोलावून सदनिकाधारकांना पार्किंगमध्ये जाण्यास बंदी केल्यामुळे वाद विकोपाला गेला आणि बांधकाम व्यावसायिकाच्या महिला बाऊन्सर आणि रहिवासी महिला यांच्यामध्ये धक्काबुक्की करत जोरजोरात आरडाओरडा करत भांडण झाले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली असून, खारघर पोलीस अधिक तपास करत आहेत.

PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY'S
ARTS, COMMERCE & SCIENCE JUNIOR COLLEGE.
VESHVI-ALIBAG-402201.

WALK-IN-INTERVIEW

VENUE: Prabhakar Patil Education Society's, Arts, Commerce & Science College. Veshvi-Alibag-402201 Director Office.
DATE: 27th April 2024
TIME: 11:00 A.M.
Contact: 8482867876

Junior College Marathi & English Medium
Permanently Unaided

| Sr.No. | Subject | Cadre | Qualifications | Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | Biology (Botany/Zoology) | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | 2 |
| 2 | Physics | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | 2 |
| 3 | Mathematics | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | 2 |
| 4 | Computer Sci. | Asst.Teacher | M.Sc./MCA/B.E/M.C.M. | 2 |
| 5 | Chemistry | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | 2 |
| 6 | Hindi | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 |
| 7 | Marathi | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 |
| 8 | Geography | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 |
| 9 | English | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 2 |
| 10 | Political Science | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 2 |
| 11 | History | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 2 |
| 12 | Commerce | Asst.Teacher | M.com.B.Ed. | 2 |
| 13 | Economics | Asst.Teacher | M.A./M.com.B.Ed. | 1 |

The eligible and desirous candidates should write hand written application on plane paper and submit it before or on the date of interview along with attested Xerox copies of the testimonials. The candidates are requested to prepare a demo lesson on their own subject.
*Note - Travelling Allowance will not be given.

Sd/SECRETARY.
(Mrs.Chitralekha N. Patil)

### जाहिर हरकत

या हरकती द्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की आमचे अशिल ९. सौ. स्वाती सचिन पानसरे, रा. क्यॅसुरिना, ॲक्केरिना को. ऑप. हौ. सोसा.. बी विंग, चौथा मजला, फ्लॅट नं. ०४, गोदरेज हिल, कल्याण (प) कल्याण ४२१३०१, २. सौ. श्रेया संदिप शेणॉय, रा. २८५८, स्वामी प्रसाद, रुम नं. ०६, संदिप गॅरेज, बल्लाळेश्वर नगर. वांगणी (पू) ४२१५०३. ३. श्री. परेश रमाकांत भगत, रा. १९५४. माऊली बंगला. वास्तूकार नगर, वांगणी (पू) ४२१५०३ यांनी दिलेल्या माहितीवरून दाखविलेल्या कागदपत्रांवरून व त्यांचे सांगण्यावरून खालील नमुद मिळकतींच्या हस्तांतरणाविषयी जाहिर हरकत प्रसिध्द करतो.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे म्हात्रोळी ता. अलिबाग जि. रायगड**

| मौजे | स.नं. (जुना) | स.नं. (नवीन) | गट नं. | ०क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| म्हात्रोळी ता. अलिबाग | १२२/२ | ६०/२ | २७६ | ०-०३-५ |
| | १३३/५ | ५५/५ | २२१ | ०-३६-७ पो.ख.०-०६-१ |
| | ९३/८ | १०/८ | ३२ | ०-१४-१ पो.ख.०-००-१ |
| | ८/३ | ९९/३ | १५ | ०-४१-५ पो.ख. ०-०३-५ |
| | ८/६ | १९/४ | | |
| | ८/५ | ९९/५ | | |

वर नमूद मिळकतींना सोयीकरिता सदर मिळकती असे संबोधण्यात येत आहे.

आमच्या अशिलांची आई श्रीमती. रंजना रमाकांत भगत (पूर्वाश्रमिची मंदाकिनी लक्ष्मण काठे) हिने कै. द्वारकानाथ लक्ष्मण काठे आमच्या अशिलांचे मामा यांच्या नावे दि. ३१/०५/२००२ रोजी विनामोबदला हक्कसोडपत्र वर नमुद मिळकती संदर्भात लिहुन दिलेले आहे.

२) वर नमूद मिळकती ह्या कै. लक्ष्मण बाळू काठे यांच्या आहेत. कै. लक्ष्मण बाळू काठे हे दि. ०८/०७/१९६४ रोजी मयत झाले. त्यानंतर त्यांना कै. द्वारकानाथ लक्ष्मण काटे व इतर पंढरीनाथ लक्ष्मण काठे, सुमती मधुकर म्हात्रे, प्रभावती शंकर कोतवाल असे वारस आहेत. त्यानुसार कै. द्वारकानाथ लक्ष्मण काठे व इतर पंढरीनाथ लक्ष्मण काठे, सुमती मधुकर म्हात्रे, प्रभावती शंकर कोतवाल यांची नावे सदर मिळकतींच्या महसूल दप्तरी लावण्यात आली. त्यामुळे वर नमूद सर्व मिळकती ह्या वडिलोपार्जित मिळकती असून सदर मिळकतींमध्ये आमच्या अशिलांचा देखील अविभाज्य हिस्सा व हक्क आहे.

३) सदर मिळकतींमध्ये आमच्या अशिलांचा अविभाज्य हिस्सा व हक्क असल्यामुळे श्रीमती. रंजना रमाकांत भगत (पूर्वाश्रमिची मंदाकिनी लक्ष्मण काठे) हिस सदर मिळकतींबाबत कै. द्वारकानाथ लक्ष्मण काठे यांच्या लाभांत हक्कसोडपत्र करण्याचा कोणताही कायदेशिर व नैतिक अधिकार नाही.

तरी वर नमुद मिळकती बाबत कै. द्वारकानाथ लक्ष्मण काठे यांना दिलेल्या दि. ३१/०५/२००२ रोजीच्या हक्कसोड पत्राच्या आधारे १. श्रीमती. रंजना रमाकांत भगत(पूर्वाश्रमिची मंदाकिनी लक्ष्मण काठे) २. श्री. प्रकाश द्वारकानाथ काठे ३. श्री. उदय द्वारकानाथ काठे ४. श्रीमती. छाया सुभाष कोतवाल ५. कै. दिपक द्वारकानाथ काठे मयत तर्फे वारस ५/१. श्रीमती माया दिपक काठे ५/२. श्री. शुभम दिपक काठे ६. श्रीमती भारती द्वारकानाथ काठे यांच्या बरोबर कोणीही कोणत्याही प्रकारे खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये. तसे केल्यास आमचे अशिल हे जमिनमालक व खरेदीदार यांच्या विरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करतील व त्यावेळी होणाऱ्या परिणामास जमिनमालक व खरेदीदार हेच जबाबदार राहतील. सदरहू मिळकतींच्या मालकी हक्काविषयी वर नमूद वस्तुस्थिति असल्यामुळे आमच्या अशिलाची सदरहू मिळकतींच्या हस्तांतरणास सक्त हरकत आहे.

अलिबाग
दिनांक : २०/०४/२०२४

**ॲड. विश्वनाथ डी. भगत**
आकार आपार्टमेंट जाधव नागर चेंढरे अलिबाग

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) रजनी रामचंद्र म्हात्रे, २) प्रफुल्ल रामचंद्र म्हात्रे, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मिळकतखार ता. अलिबाग, जि. रायगड | ५९ | क्षेत्र ०-२०-९० पो. ख ०-०५-१० एकूण क्षेत्र ०-२६-०० | १.२५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत ह निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २०/०४/२०२४

**ॲड. विनित जितेंद्र वर्तक**
रा. बुरुमखाण, वरसोली,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या मौजे खारपेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक मे. सिरीस इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड हे असून यांचेकडून विकत घेणे संदर्भात बोलणी चालु असुन सदर मिळकतींचा व्यवहार करण्याचा ठरलेले आहे. सदर त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | विदयमान मालक | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| खारपेढांबे ता. अलिबाग, जि. रायगड | मे.सिरीस इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड | ५८ | ०-१४-०० ०-०२-०० ०-१६-०० | १२.६२ |
| | | ६१ | १-७५-७० ०-०६-६० १-८२-३० | १४.१३ |
| | | ७० | १-१२-१० ०-०४-०० १-१६-०० | १.१९ |

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यासहीत सादर करावी.


मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : २१/०४/२०२४

**ॲड. पुनित रविंद्र पाटील**
मु.पो. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८१४९५१६०३५

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २१ ते २७ एप्रिल २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**



## रागावर नियंत्रण ठेवा

**मेष :** मेष राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. यामुळे तुम्ही ज्यांच्यावर प्रेम करतात, त्यांच्या आईकडून या काळात तुम्हाला समर्थन मिळू शकते. म्हणजे, काही गोष्टींना घेऊन ते तुमच्या जोडीदारापेक्षा तुमच्यावर विश्वास दाखवू शकते. या सप्ताहात तुम्हाला छातीदुखीची समस्या होऊ शकते. खासकरून, छातीच्या उजव्या बाजूच्या हिश्यामध्ये अधिक दुखापत होईल. तसेच, कंबरेच्या डाव्या बाजूलाही दुखणे असू शकते. नियमित एक ठरलेल्या वेळी महामृत्युंजय मंत्राचा १०८ वेळा जप करा. आणि मित्रांच्या समस्यांना जाणून त्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. **महिलांना-** आप्तेष्टांच्या संपर्कात राहून ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. **शुभदिनांक** - २२,२३.



## परीक्षेत यश मिळेल

**वृषभ :** वृषभ राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला भाग्याची पूर्ण साथ मिळेल आणि भाग्याच्या बळावर तुम्ही कुठल्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवू शकता. प्रेम जीवनात यश मिळवण्यासाठी तुम्हाला आपल्या व्यवहारात विनम्रता आणण्याची आवश्यकता असेल. जर तुम्ही प्रत्येक गोष्टीला घेऊन राग करत असाल, तर तुमचा लवमेट या काळात तुमच्यापासून दूर होऊ शकतो आणि वादाची स्थिती ब्रेकअपपर्यंत पोहोचू शकते. घरातील स्थितीला उत्तम बनवण्यासाठी तुम्हाला आपल्या जीवनसाथीची प्रत्येक गरजेच्या गोष्टीवर सल्ला घेतला पाहिजे. या राशीतील ते जातक जे कुठल्या लांब आजाराने चिंतीत आहे, त्यांनी नियमितपणे आपले चेकअप डॉक्टरांकडून केले पाहिजे आणि नियमित औषधांचे सेवन केले पाहिजे. नियमित सूर्योदयाच्या वेळी श्री गणेश वंदनाचा जप करा. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभदिनांक-** २१,२४




## कुटुंबाचा सहयोग मिळेल

**मिथुन :** आपले ग्रहमान पाहता या राशीतील लोकांचे अवस्था थोडी कडू थोडी गोड राहील. करिअरच्या दृष्टीने पाहिले असता या राशीतील लोकांचा कालावधी शुभ राहील. निजी आयुष्यात तुम्ही बरेच आनंदी राहाल म्हणून, तुम्ही कार्यक्षेत्रातही चांगले प्रदर्शन करू शकाल. तुम्ही प्रत्येक कार्यात आपले सर्वश्रेष्ठ देण्याचा या काळात प्रयत्न कराल. जर तुम्ही नोकरी करत असाल, तर या महिन्यात त्यांना चांगल्या पगाराच्या नवीन नोकरीचा प्रस्ताव मिळू शकतो. तसेच या राशीतील काही जातकांच्या आईच्या कमाईमध्ये वृद्धी होण्याने घरातील आर्थिक स्थिती सुधारू शकते. तुमच्या आईचे आरोग्य या दिवसात खूप चांगले राहील. यामुळे तुम्ही बऱ्याच चिंतांनी मुक्त व्हाल. तुमच्या आईवडिलांच्या आरोग्यातही सकारात्मक बदल होण्याची पूर्ण शक्यता आहे. या दिवसात तुम्ही कुटुंबियांच्या सल्ल्याने नवीन गाडी किंवा बाइक खरेदी करू शकतात. या राशीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षणाच्या क्षेत्रात या सप्ताहात आपल्या कुटुंबाचे पूर्ण सहयोग मिळेल. **महिलांना-** नियमित सूर्योदयाच्या वेळी हनुमान चालीसाचे पाठ करा. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **शुभदिनांक-** २५,२६.



## कलागुणांना प्रोत्साहन मिळेल

**कर्क :** कर्क राशीधारकास या सप्ताहात आपण व्यवहारातील लालचीपणापासून लांब राहा. तुम्ही घरातील लोकांसोबत याच मुद्द्याला घेऊन वादविवाद करू शकतात. या राशीतील काही जातक शाळा किंवा कॉलेजमध्ये आपल्या कुणी प्रिय मित्र-मैत्रिणींसोबत वाद करू शकता. यामुळे त्यांच्या शिक्षणात समस्या येऊ शकतात. म्हणजे, त्यांचे लक्ष सारखे-सारखे विचलित होऊ शकते. तुम्हाला वैवाहिक जीवनात या दिवसांत चांगल्या फळांची प्राप्ती होईल. या काळात या राशीतील जातकांना गुप्तांग संबंधित समस्या होऊ शकते. तुम्हाला अंघोळीच्या वेळी आपल्या शरीराला चांगली प्रकारे साफसफाई केली पाहिजे. यासोबतच डोकेदुखी समस्याही होऊ शकते. **महिलांना-** या राशीतील जातकांना नियमित ओम गण गणपते नमः मंत्राचा १००८ वेळा जप केला पाहिजे. कौटुंबिक जीवनाची गोष्ट केली असता या महिन्यात तुमच्या वडिलांचे मन कुठल्या गोष्टीला घेऊन चिंतीत होऊ शकते. अशा वेळेत तुम्हाला आपल्या वडिलांसोबत वेळ व्यतीत केला पाहिजे. **शुभदिनांक** - २१,२७.



## शुभसंकेत मिळतील

**सिंह :** सिंह राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. या काळात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. महिलावर्गाला सासूरवाडीकडून काही शुभ संकेत मिळतील. तुमची आई या साप्ताहात तुम्हाला शिक्षणाच्या क्षेत्रात बरीच मदत करू शकते. त्यांची मदत मिळवून तुम्ही मोठ्यातील मोठी समस्या शिक्षणाच्या क्षेत्रात खूप सहजरित्या पार पडाल. या राशीतील विवाहित जातकाचे जीवनसाथी या कालावधीत एक मित्रासारखे त्यांच्याशी व्यवहार करू शकतात. या राशीतील जातकांना या कालावधीत खांदेदुखीची समस्या होऊ शकते. तुम्हाला आपल्या कामामध्ये काही वेळ काढून आराम नक्कीच केला पाहिजे. **महिलांना-** नियमित सूर्योदयाच्या वेळी ओम नमः नारायणाचा १०८ वेळा जप करा. यावेळी तुम्हाला शिक्षणक्षेत्रात यशस्वी फळ मिळण्यासाठी कठीण मेहनत करण्याची आवश्यकता आहे. **शुभदिनांक** : २२,२७



## आरोग्याची काळजी घ्या

**कन्या :** कन्या राशीसाठी या सप्ताहात या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी खूप चांगला राहण्याची शक्यता आहे. या राशीतील विवाहित जातकांना या महिन्यात आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असेल. कारण, जीवनसाथीची आरोग्य या दिवसात खराब होऊ शकते. गृह नक्षत्रांची चाल पाहिल्यास या काळात तुमच्या आरोग्याची स्थिती खूप चांगली सांगितली जात नाही. या दिवसांत तुम्हाला डोळे, डोके आणि कानामध्ये समस्या होऊ शकतात. नियमित सूर्योदयाच्या वेळी श्री अष्टलक्ष्मी पाठ करा. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. या कालावधीत तुमचे वैवाहिक जीवन आणि प्रेम जीवन सामान्य राहिले तरी या राशीतील जे जातक प्रेमसंबंधात पडलेले आहे. **महिलांना-** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा काळजी घेणे आपले काम आहे. मैत्रीमध्ये वाहात जाऊ नका. **शुभदिनांक-** २३,२५




## धनलाभ संभवतो

**तुळ :** तुळ राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीतील जातक खूप भावूक असतात आणि बऱ्याच वेळा यांच्या भावना यांच्यासाठी त्रासाचे कारण बनू शकते. कार्यक्षेत्रात होणाऱ्या राजकारणाच्या कारणाने किंवा आपल्या कमी कमाईच्या कारणाने समस्या आहे. तर, या महिन्यात तुमच्या जीवनसाथीकडून तुम्हाला सल्ला दिला जाऊ शकतो. तुमचा जीवनसाथी या कालावधीत एक मार्गदर्शक म्हणून तुम्हाला दिशा दाखवेल. या राशीतील जातकांना यावेळी धन हानी होऊ शकते. या काळात तुम्हाला देवाण-घेवाणीच्या बाबतीत थोडी सावधानी ठेवावी लागेल. प्रत्येक घरात जितके लोक असतात, तितकेच वेगवेगळे विचारही असतात. बऱ्याच वेळा असे होते की, तुम्हाला दुसऱ्यांच्या विचार आवडत नाही; परंतु, तरी ही त्यांच्या गोष्टी मानाव्या लागतात. कलाकारांना मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. एखादी नवी ऑफर येईल, ती घेण्यास हरकत नाही. **महिलांना-** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभदिनांक-** २४,२६




## कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल

**वृश्चिक :** वृश्चिक राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता जगामध्ये आपली वेगळी ओळख बनवण्यासाठी या आठवड्यात तुम्ही कठीण मेहनत कराल. जर तुम्ही आपली मेहनत कायम ठेवली, तर तुम्हाला यश मिळवण्यात कुणी थांबवू शकणार नाही. या राशीतील जातकाच्या करिअर क्षेत्रात या सप्ताहात काही चढ-उतार येऊ शकतात. तुमच्या खर्चात होणारी वाढ या काळात तुम्हाला मानसिक तणाव देऊ शकते. या दिवसांत कुणाला उधार देणे टाळले पाहिजे. कारण, या साप्ताहात तुमच्या कुटुंबातील खर्च वाढतील म्हणून, तुम्ही आपल्या कुणी जवळच्या नातेवाईकांकडून उधार माघू शकतात. तथापि, तुम्हाला हाच सल्ला असेल की, उधार माघू नका आणि आपल्या गरजांवर प्रतिबंध आणा. **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. भाग्याच्या बळावर तुम्ही कुठल्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवू शकतात. **शुभदिनांक-** २३,२५



## धार्मिक कार्यात सहभाग

**धनु :** धनु राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण या राशीतील जातकांच्या डोक्यात या आठवड्यात टीव्ही, मोबाइल, मित्र सोडून इतर जीवनाची सार्थकता, जीवनात कशी चांगल्या प्रकारे व्यतीत करू शकतो या प्रकारे विचार येऊ शकतात. आपल्या करिअरला उज्वल बनवण्यासाठी लागोपाठ आपली योग्यता पाहत राहणे खूप गरजेचे आहे. या काळात तुम्हीही या गोष्टीला उत्तमरित्या समजू शकतात. तुमचा नवम भाव सक्रिय असण्याने या महिन्यात धार्मिक कार्यात तुमचा खर्च होऊ शकतो. तथापि, यामुळे तुम्हाला जास्त फरक पडणार नाही तर, यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. या काळात तुम्ही आपल्या नातेवाईकांसोबत मिळून कुठल्या धार्मिक स्थळी काही आयोजन करू शकतात. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी थोडा प्रतिकूल राहू शकतो. **महिलांना-** आपण आपली अस्मिता क्षुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. आपली माहेरची माणसे घरी येतील, त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका. **शुभदिनांक-** २४,२६



## आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा

**मकर :** हा सप्ताह मकर राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता राशीतील जातकांमध्ये उत्तम ऊर्जा आणि नेतृत्व क्षमता असते. आपल्या याच गुणांच्या कारणाने लोकांमध्ये या राशीतील वेगवेगळे दिसतात. या राशीतील त्या जातकांना या कालावधीत मेहनत करावी लागेल ज्याची अद्याप नोकरी लागलेली नाही. तुम्हाला या महिन्यात मित्र आणि टीव्ही तसेच मोबाइलपासून दूर राहावे लागेल, तरच तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळू शकते. या राशीतील जातकांच्या आर्थिक पक्षात नजर टाकली असता यात सुधारणा होण्याची पूर्ण शक्यता आहे. जर तुम्ही कुणाला उधारी दिलेली आहे, तर या काळात तुम्हाला तुमची उधारी परत मिळू शकते. यामुळे तुमच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल. कौटुंबिक जीवनात मोठ्या भाऊबहिणींचे पूर्ण सहयोग मिळेल. **महिलांना-** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून, त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. तुम्हाला घरातील लहान सदस्यांनाही वेळ दिला पाहिजे आणि त्यांच्यासोबत खेळून आणि त्यांना वेळ देऊन जवळीकता वाढवली पाहिजे. **शुभदिनांक-** २५,२८



## सकारात्मक परिवर्तन घडेल

**कुंभ :** कुंभ राशी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीतील लोकांसाठी हा कालावधी शुभ फलदायी राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुम्ही आपल्या करिअरमध्ये सकारात्मक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केला आहे, ज्याचे उत्तम फळ तुम्हाला या वेळेत नक्कीच मिळेल. तुमच्या कार्यक्षेत्रात तुमची प्रगती होऊ शकते आणि यासोबतच तुमच्या कमाईमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. तुमच्या आर्थिक पक्षाची गोष्ट केली तर, या कालावधीत तुमचे लाभ भाव सक्रिय होण्यापेक्षा तुम्हाला परदेशी स्रोतांनी अधिक लाभ होऊ शकतो. कौटुंबिक जीवनाची गोष्ट केली तर हा कालावधी तुमच्यासाठी सुखद राहील. जर मोठ्या भाऊ बहिणींसोबत कुठल्या गोष्टीला घेऊन वाद चालत असेल, तर हा वाद या काळात दूर होऊ शकतो. या राशीतील विद्यार्थी या सप्ताहात शिक्षणाच्या क्षेत्रात अधिक चांगले प्रदर्शन करतील. प्रेमजीवनाची गोष्ट केली असता हा कालावधी तुमच्यासाठी उत्तम सिद्ध होऊ शकतो. **महिलांना-** तुमची आरोग्यासंबंधित गोष्ट केली असता या सप्ताहात तुम्हाला शरीराच्या उजव्या भागात दुखू शकते म्हणजे उजव्या भागाच्या डोक्याची बाजू किंवा हात दुखण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक-** २३,२७



## कौटुंबिक जीवन यशस्वी

**मीन :** मीन राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीतील व्यक्तींना हा कालावधी मिश्रस्वरूपाचा जाणार आहे. काही चांगल्या संधी आपल्या हातातून जणार नाही याची काळजी घ्या. ज्यास्त विचार न करता केलेली कृती आपणास हानिकारक ठरू शकते. आपल्या जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती होणार असतेच; परंतु, हे लोक विचार न करण्यामुळे हे आपला वेळ खराब करून बसतात. आपल्या कामावर तुमच्या चांगल्या कामाच्या कारणाने काही लोक तुमच्या कार्यक्षेत्रात तुमचे शत्रू बनू शकतात आणि तुमच्या पाठीमागे कारस्थान रचू शकतात. म्हणून, आपल्याला कार्यक्षेत्रात खूप विचार करून चालण्याचा सल्ला दिला जातो. कौटुंबिक जीवनात या सप्ताहात हालचाल होऊ शकते. जमिनीच्या वाटणीला घेऊन तुम्ही घरातील वरिष्ठ लोक आणि आपल्या भाऊ बहिणींसोबत वाद करू शकतात. **महिलांना-** तुमच्यामुळे कुटुंबात तणाव स्थिती बनू शकते. जर तुम्हाला वाटले की, या जमिनीची वाटणी गरजेची आहे, तर तुम्ही जो विचार करत आहे तो तर्कसंगत आहे. तुम्हाला शांती आणि शालीनतेने सर्वांसोबत बसून बोलणी केली पाहिजे. **शुभदिनांक-** २४,२५

# सुखी माणसाचं स्वप्न



**निलेश साठे**

मला गरिबीची भयंकर चीड आहे. उघड्यानागड्या दिन दुबळ्या लाचार आणि भिकारी लोकांना बघितले की मला 'मणूस' असलेल्याचा पश्चाताप होतो. का एवढा माणूस गरीब आहे.? का दारिद्र्यात खीतपत पडला आहे.? मेहनत करा पैसा कमवा, पैसा वाचवा, व्हा श्रीमंत. इतकं सोपं आहे. तरीसुद्धा माणूस लाचार आणि गरिबीचं आयुष्य जगत आहे. काम-धंदा नाही बेरोजगार आहेत.

जगातला प्रत्येक मनुष्य गर्भ श्रीमंत असावा अशी माझी मनोमन इच्छा आहे. मग असं काय केलं पाहिजे जेणेकरून जगातला प्रत्येक मनुष्य श्रीमंत झाला पाहिजे? प्रत्येकाच्या घरामध्ये सुख समृद्धी आणि ऐश्वर्य असले पाहिजे. प्रत्येक मनुष्य सुख समाधानात राहिला पाहिजे. सर्व दु:खाचे मूळ हे पैसा आहे असं मला वाटतं. प्रत्येकाकडे पैसा आला की सर्वजण सुख समाधानात राहतील. त्यांना कुठल्याही प्रकारची कमतरता भासणार नाही. खाऊन पिऊन मस्त मजे मध्ये राहतील. सगळीकडे आनंदाचे वातावरण असेल. कुणीही गरीब दिन दुबळा आणि लाचार राहणार नाही. कधीही कुणी उपाशीपोटी राहणार नाही. सगळ्यांच्याकडे तुफान पैसा असेल. कुठलंही सुख आणि समाधान ते चुटकी सरशी विकत घेऊ शकतील. मग आपण असं काय केलं पाहिजे की लोकांच्याकडे खूप पैसा येईल.

मला असे वाटते हेलिकॉप्टरमध्ये बसावे आणि वरून पैशांची उधळण करावी. नोटांची बंडलेच्या बंडले शेतामध्ये फेकावी. प्रत्येकाच्या घराघरावर जाऊन पैशांची उधळण करावी. सर्वांना खूप पैसे वाटावेत. जेवढा पाहिजे तेवढा पैसा लोकांनी उचलून घ्यावा. घर भरून पैसा घ्यावा. इतके पैसे वाटावेत की इतके पैसे वाटावेत की चोहोकडे फक्त पैसाच पैसा दिसेल. आणि त्या पैशाने प्रत्येकाने घर गाडी बंगला खरेदी करावे. हवे असलेल्या सर्व वस्तू विकत घ्याव्यात.

कशाचीही कमतरता भासू नये. एवढा सगळा पैसा हाती आल्यावर सर्वजण श्रीमंत होतील. सर्वजण खाऊन पिऊन सुखी समाधानात राहतील. कुणीही दिन दुबळा गरीब आणि लाचार राहणार नाही. असे मला वाटते.

पण असे जर झाले तर, सगळेच जर श्रीमंत झाले तर काम कोण करणार काम कोणीच करणार नाही. जो तो ऐशो आरामाचे आयुष्य जगत राहील. नवनिर्मिती होणार नाही. कोणीही साहेब शेठ नोकर राहणार नाही. सगळे व्यवहार जिथल्या तिथे ठप्प होतील. जो तो आपापल्या धुंदीत मस्त राहील. जी काही कामे करायचे आहेत ती सुद्धा कोणी करणार नाही. त्यामुळे प्रत्येकाला आपापले काम स्वत:लाच करावे लागेल. मग ज्याची शारीरिक क्षमता नाही त्या माणसाने काय करायचं. त्याचं काम कोण करणार. खालच्या आणि दुय्यम दर्जाचे काम कोण करणार. उच्च प्रतीचे कामे आहेत ती सुद्धा कोणी करणार नाही. जिकडे तिकडे हाहाकार माजेल. कोणी कोणाचे ऐकून घेणार नाही. आणि हे सुखही फार काळ टिकणार नाही कारण प्रत्येकाकडे पैसा आल्यामुळे प्रत्येक जण आळशी बनेल. काम धंदा कोणी करणार नाही. त्यामुळे माणूस सुस्तावेल. आणि त्याची वयोमर्यादा कमी होईल.

> **प्रत्येक माणसाला वाटते आपल्या जवळ काहीतरी असं असावं की जेनेकरून आपलं जीवन सुखी व्हावं, पण सुख दु:ख या लागल्याच गोष्टी आहे. असं नाही की गरीबाला दु:ख आणि श्रीमंताला सुख आहे. गरीबाला सुद्धा सुख दु:ख आहे आणि श्रीमंताला पण आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनात अनेक दु:खांना, अडचणींना, संकटांना समोर जाऊन सुखाचे दिवस आणत असतो. सर्वांचे विचार वेगवेगळे असतात. प्रत्येकाच्या मनात एक कला दडलेली असते.**

शेतकरी शेती करणार नाही धान्य पिकवणारा पिकवणार नाही. मग खाणारा काय खाणार. कोणाला कोणाचे काहीच पडले नसल्यामुळे नवीन निर्मिती सुद्धा होणार नाही. खायलाच भेटलं नाही तर माणूस जगणार कसा. नवनिर्मिती कशाची होणार आणि करणार कोण जर माणूसच राहिला नाही तर पृथ्वी टिकणार कशी. त्यामुळे माझी ही संकल्पना अतिशय चुकीची आहे. देवाने जे काही बनवले ते अतिशय सुंदर आहे. कोणीतरी श्रीमंत, गर्भ श्रीमंत, मध्यमवर्ग असायलाच पाहिजे. कोणीतरी लाचार दुबळा गरीब असायलाच पाहिजे. गरीब आणि श्रीमंत ही दरी असायलाच पाहिजे. प्रत्येक जण एकमेकांवर अवलंबून आहे. कर्ता करविता तो परमपिता परमात्मा आहे त्याने सगळं काही व्यवस्थित केलं आहे. त्याच्या इच्छे नुसारच ही धरती चालली आहे.

आपल्याला वाटतं सगळे आपल्या मनाप्रमाणे घडावं परंतु तसे घडत नाही कारण ती ईश्वराची इच्छा असते. ईश्वर सगळं काही व्यवस्थित करतो. ईश्वर जे आपल्याला हवं आहे ते देत नसतो. आपल्यासाठी जे चांगलं आहे ते तो देत असतो.

ईश्वराचे नामस्मरण करत जे आपल्या वाटेला कर्म आले आहे ते आपले कर्म करत राहावे. आणि आपल्या हातून जे काही चांगलं कार्य होईल ते करत राहावे. फळाची अपेक्षा न करता आपण आपले चांगले कार्य करत राहिले तर जे आपल्यासाठी चांगलं आहे ते एक ना एक दिवस आपल्याला मिळणारच.

आपण फक्त आशा आणि अपेक्षा करू शकतो. प्रयत्न करू शकतो. द्यायचं की नाही द्यायचं हे त्या ईश्वराच्या हाती हेच त्रिवार सत्य आहे. ही दुनिया त्याने बनवली आहे. त्याच्या इच्छाशिवाय पानही हालत नाही. अर्थात माझ्याकडेही इतके पैसे नाहीत की मी हेलिकॉप्टरमध्ये बसून पैसे वाटावेत. आणि या जन्मी ते शक्य होणार नाही ईश्वराची तशी ईच्छा नाही असे मला वाटते. **



## मोहोर

**निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा कणा आहे. विशेषत: निवडणुकांमध्ये स्थानिक स्तरावरील समस्यांची सोडवणूक करण्यासाठी मतपेटीच्या माध्यमातून योग्य प्रतिनिधी निवडणे आवश्यक आहे. या निवडीवरच विकासाचे नियोजन आणि सामाजिक विकास अवलंबून असते. म्हणून मुक्त आणि निर्भय वातावरणात मतदारांनी मतदान करायला हवे. निवडणुकांच्या वेळी कोणत्याही प्रलोभनाला किंवा दबावाला बळी न पडता आपल्या मताधिकाराचा उपयोग करायला हवा. योग्य पद्धतीने केलेले मतदान आपल्या हक्काचे रक्षण करण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल असते हे नेहमी लक्षात ठेवायला हवे. निवडणूक आयोगाने मतदानातील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी निवडणूक ओळखपत्र तयार करण्याची विशेष मोहीम राबविली. मात्र अशा मोहिमेत शासनाचे काम अशा पद्धतीने याकडे लक्ष न देता देशाप्रतीचे महत्त्वाचे कर्तव्य म्हणून या मोहिमेस आपला सहभाग नोंदविणे गरजेचे आहे.**

# 'हतबल मतदार'



**कोकणस्पंदन**
**धनंजय शेट्ये**

अण्णानेती पाचशे नोट अगदी चारपाच घड्या करुन सुरकुत्या हाताच्या घट्ट मुठीत करकचून धरली. पुढच्या दोन दातांच्या फटितुन जीभ बाहेर काढत सुरकुत्या चेहऱ्यावर आनंद व्यक्त करत, किंचित याचकाच्या नजरेने बसल्या खूर्चीतून उभा राहण्याचा प्रयत्न करत थरथरत्या दोन्ही हातांनी एकवटून नमस्कार करण्यासाठी प्रयत्न करु लागला. पंच्याहत्तरी ओलांडलेला अण्णा आता जाग्यावरच पडून होता.पाच-सहा वर्षांनंतर कोणीतरी त्यांच्या हातावर पैसे कोणीतरी ठेवले होते. एरवी जाग्यावर पडलेला माणूस पैशांचे तरी काय करणार म्हणा! जुनं फर्निचर असल्यासारखे जीवन जगत होता.

आज अंथरुणावर पडलेला हा हतबल झालेला मतदार ती पाचशे नोट हातात घेऊन आपल्या वार्धक्याकडे, आपल्या असाहय्यतेकडे केविलवाण्या नजरेने पाहत होता. आपली किंमत बकऱ्यापेक्षाही कमी हे दु:ख त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होते.

तेवढ्यात अण्णांचा झील चारपाच बिर्याणीचे खोके घेऊन पडवीत पोहोचला. अण्णाने लगेच ती चुरगाळलेली पाचशेची नोट कमरेला खणवटीला धोतराच्या गाठीत बांधून मुंजीत अडकवून लपवली.

बापाच्या पुढ्यात एक अख्खा बिर्याणीचा खोका पुढे करत झील बोलला,

'अण्णा ह्या घेवा, प्वॉटभर खावंन घेवा. पाच वर्सान एकदा गावतला.'

अण्णांने थरथरत्या हाताने तो बिर्याणीचा खोका हातात घेतला.

तेवढ्यात खालच्या अवाटातला सदग्या व्हाळकर निरोप घेऊन आला.

'तात्यासाहेब जावकर उद्या सकाळी घराकडे रिक्षा पाठवतले हत. अण्णांक तयार रवांक सांगल्यनी हा!'

'माका घोपान नाया... माका परसाकडे जावंक जमना नाय... तर मतदान करुक कसा जावंक जमतला.'

'जमवंक होया!!

असा कसा अण्णा,हयती बिर्याणी तात्यासाहेबानच दिल्यानं हा, शिवाय माणशी पाच-पाचशे रुपये घरात धाडल्यान हत. आता नाय म्हणान कसा जमात? खाल्ल्या मीठाक जागाक होया!'



आता अण्णाची पंचायत झाली होती कारण विरोधी पार्टीच्या उमेदवाराने पण पैसे दिले होते.

खणवटीला लपवलेल्या पैशांची वाच्यता होईल म्हणून अण्णा गप्पच राहिला होता.

तेवढ्यात विरोधी पार्टीतला वरच्या अवाटातला मन्या पवार एक पाकिट हातात घेऊन धावत आला आणि ते पाकीट अण्णांच्या झीलाच्या हातावर ठेवत म्हणाला,

'पाच माणसांचे अडीच हजार हत. सायबांनी पाठवल्यानी हत. उद्या मतदान करुक येवसाठी गाडी पाठवतले हत. अण्णाक तयार रवांक सांगल्यनी हा!'

आता अण्णा पडक्या दातांच्या फटितुन आपली जीभ बाहेर काढून मजेत हसत होता.

'चालान इल्ली लक्ष्मी नाकारु नुको...घे झीला पुढचा पुढे बघूया!'

आज नाईलाजाने मतदार पाच पन्नास रुपयांमध्ये विकला जात आहे. लोकशाही?? ही कसली लोकशाही पैशात विकली जाणारी मते देशाचा कारभार कसा काय सावरु शकणार? आजची तरुणाई मोबाईल मध्ये अडकून पडली आहे, गुणवत्ता बेकारीच्या दावणीला बांधली गेली आहे. वृद्धावस्था पराधिन झाली आहे मग देश सांभाळायचा तरी कुणी? भ्रष्टाचारावर श्रीमंतीचे इमले बांधलेल्या लोकप्रतिनिधीकडून कोणत्या अपेक्षा ठेवणार म्हणा! आजचा सुशिक्षित वर्ग मतदानाची एक दिवसीय सुट्टी रिसोर्टमध्ये मनसोक्त मजा लुटण्यासाठी घालवत आहे. मतदार राजा आता तरी या परिस्थितीतून जागा हो..! पण जागा होऊन तरी काय करणार म्हणा? समोर पर्यायच सक्षम दिसत नाही.मत द्यायचं तरी कुणाला? सर्व काही बरबटलेलं दिसत आहे मग तो जागृक मतदार तरी काय करणार? हक्क आहे हक्क बजावलाच पाहिजे लोकशाही मजबूत केली पाहिजे.ही सर्व पुस्तकी वाक्य व्यवहारिक जीवनात कितपत खरं ठरतील? आपण मत दिलेला लोकप्रतिनिधी विजयी झाल्यानंतर पार्टी बदलणार नाही कशावरून?

बस्स! आता हे भ्रष्टाचाराचे साम्राज्य कुठे तरी थांबलं पाहिजे यासाठी आपणच प्रयत्न करायला हवा. आजच्या तरुणाईने राजकीय क्षेत्रात उडी घेतली पाहिजे. त्याशिवाय समाज बदलणार नाही. **

# पृथ्वी वाचवू या...



***ज्या ग्रहावर आपण राहतो, त्या पृथ्वीचे आरोग्य हा गंभीर चिंतेचा मुद्दा बनला आहे. दर वर्षी २२ एप्रिल रोजी 'पृथ्वी दिन' साजरा केला जातो. यंदाचा पृथ्वी दिन साजरा करण्याची तयारी सुरु असताना पर्यावरणाची स्थिती प्रत्येकाला अंतर्मुख करायला लावत आहे. जागतिक पर्यावरणीय जबाबदारीची वचनबद्धता पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. वसुंधरेला जपण्यासाठी प्रत्येक नागरिकाने का आणि कसे योगदान द्यायला हवे?***

**मिलिंद बेंडाळे**

पृथ्वी हे आपले एकमेव घर आहे आणि तिचे आरोग्य आणि स्थिरता मानवी जीवनासाठी आवश्यक आहे. पृथ्वीवरील हवामान सामान्य असेल, तरच जीवसृष्टी टिकून राहू शकते. निसर्गाने त्यात बदल केला तर संपूर्ण मानवी संस्कृती पापण्या लवतात न लवतात तोच नाहीशी होऊ शकते; पण शोकांतिका अशी आहे की या विषयावर आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जगातील आघाडीच्या राजकारण्यांनी सखोल विचार करून आणि महत्त्वाच्या घोषणा करूनही पृथ्वीवरील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. निसर्ग आपल्याला वारंवार इशारा देत देत आहे. अवकाळी पाऊस, बर्फवृष्टी, पूर, दुष्काळ अशा परिस्थितीतही आपण निसर्गाच्या या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहोत. पृथ्वीवर जीवसृष्टीच नसेल तर प्रगती, पैसा आणि जगभरच्या शर्यतीत अधिक ताकदवान होण्यात काय अर्थ आहे? दर वर्षी २२ एप्रिल रोजी जगभरातील लोक 'जागतिक पृथ्वी दिन' साजरा करतात. ते आपल्याला आपल्या ग्रहाचे संरक्षण करण्याच्या कर्तव्याची आठवण करून देतात. पृथ्वी ही एकमेकांशी जोडलेल्या आणि परस्परावलंबी भागांची एक जटिल प्रणाली आहे, जी जीवन टिकवून ठेवते. आपण श्वास घेतो. पृथ्वी देत असलेल्या अन्नपदार्थांवर जगतो. पृथ्वी आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी पुरवते. तथापि, मानवी क्रियाकलापांनी ग्रहावर प्रचंड दबाव आणला आहे. त्यामुळे परिसंस्था आणि जैव विविधतेचे अपरिवर्तनीय नुकसान झाले आहे. हवामानबदल हा पृथ्वीला भेडसावणारा सर्वात महत्त्वाचा धोका आहे.

पृथ्वीचे सतत वाढत जाणारे तापमान, वितळणारे बर्फाचे आवरण आणि अत्यंत प्रतिकूल हवामानातील घटनांचा आपल्या ग्रहावर आधीच गंभीर परिणाम होत आहे. समुद्राची पातळी वाढत असून संपूर्ण परिसंस्था नष्ट होत आहे. त्यामुळे वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. हवामानबदलामुळे उष्माघात, श्वसनाचे आजार आणि संसर्गजन्य

रोगांच्या वाढत्या घटनांसह मानवी आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे. प्रदूषण ही सर्वात मोठी समस्या आहे. पृथ्वीवरील सर्व प्रकारचे वेगाने वाढणारे प्रदूषण ही सर्वात मोठी समस्या आहे. ती पृथ्वी आणि तेथील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आणत आहे. हवेतील आणि पाण्यातील विषारी रसायनांपासून महासागरातील प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे पर्यावरण आणि वन्यजीवांचे नुकसान होत आहे. प्रदूषणामुळे होणारे जैवविविधतेचे नुकसान ग्रहाची हवामानबदलासाठी लवचिकता कमी करते. त्यामुळे ते हवामानाच्या घटना आणि इतर पर्यावरणीय आपत्तींना अधिक असुरक्षित बनवते.

जागतिक वसुंधरा दिवस आपल्या ग्रहाचे संरक्षण करण्याच्या कर्तव्याची जागतिक आठवण म्हणून कार्य करते. जागतिक वसुंधरा दिन १९७० मध्ये पहिल्यांदा साजरा करण्यात आला आणि तेव्हापासून हा दिवस प्रत्येक प्रकारे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, जनतेला या दिशेने जागरुक करण्यात आणि हवामानबदलाबद्दल जगाला सतर्क करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जागतिक वसुंधरा दिनाचे उद्दिष्ट लोकांना पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी आणि टिकावूपणाला प्रोत्साहन देण्यासाठी कृती करण्यास आखणे हे आहे. शैक्षणिक कार्यक्रम, 'सोशल मीडिया'वरील मोहिमा आणि इतर कार्यक्रमांद्वारे जगभरातील लोक पृथ्वीवरील मानवी क्रियाकलापांच्या प्रभावाबद्दल जागरुकता निर्माण करू शकतात. आज कार्बन उत्सर्जन कमी करून पाण्याचा पुनर्वापर करण्याची तीव्र गरज आहे. जागतिक वसुंधरा दिनाचा आणखी एक आवश्यक पैलू म्हणजे शाश्वत पद्धतींना चालना देण्याबाबतची भूमिका. लोकांनी त्यांचे कार्बन फूटप्रिंट कमी करणे, पुनर्प्रक्रिया करणे, पाणी आणि ऊर्जेचे संरक्षण करणे आवश्यक आहे. जागतिक वसुंधरा दिन ही पर्यावरण संरक्षणाला समर्थन देणाऱ्या धोरणातील बदलांसाठी प्रयत्न करण्याची संधी आहे. हरित वायूचे प्रमाण कमी करणे, वन्य जीवांचे संरक्षण करणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे या उद्देशाने नवीन उपक्रम आणि धोरणे जाहीर करण्यासाठी सरकार आणि व्यवसाय जागतिक पृथ्वी दिनाचा व्यासपीठ म्हणून वापर करू शकतात.



पृथ्वी दिन हा जागतिक कार्यक्रम बनला आहे. तो १९३ पेक्षा जास्त देशांमध्ये साजरा केला जातो. दर वर्षी एक अब्जहून अधिक लोक त्यात सहभागी होतात. वसुंधरा दिनाचा उद्देश व्यक्ती, समुदाय आणि सरकारांना पर्यावरणाच्या महत्त्वाची प्रशंसा करण्यासाठी शिक्षित करणे, प्रेरणा देणे, संघटित करणे आणि त्याचे संरक्षण आणि पुनर्संचयित करण्यासाठी गुंतवणूक करणे आहे. याद्वारे पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आणि मानवी क्रियाकलापांचे प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी त्वरित पावले उचलण्यावर लक्ष केंद्रित केले गेले आहे. 'पृथ्वी दिन २०२४'ची नवी थीम हा संदेश पुढे नेईल, जबाबदार वर्तनाचा पुरस्कार करेल. त्यामुळे आपल्या ग्रहाचे संरक्षण होईल आणि सर्वांसाठी शाश्वत भविष्य सुनिश्चित होईल. पृथ्वी दिनामध्ये सहभागी होणे हा आपल्या ग्रहावर सकारात्मक प्रभाव पाडण्याचा एक शक्तिशाली मार्ग आहे. स्थानिक स्वच्छता मोहिमांमध्ये भाग घेणे असो, झाडे लावणे असो, कार्बन फूटप्रिंट कमी करणे असो किंवा धोरणबदलाचे समर्थन करणे असो; प्रत्येक कृती महत्त्वाची असते. पर्यावरणाचा प्रभाव कमी करण्यासाठी आपण दैनंदिन जीवनात कोणते बदल करू शकतो, स्थानिक समुदायांना त्यांच्या टिकाऊपणाच्या प्रयत्नांमध्ये अधिक चांगले समर्थन कसे देऊ शकतो, जागतिक स्तरावर पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व कसे वाढवू शकतो याचा विचार आज करण्याची आवश्यकता आहे.

जसजसे आपण पुढे जात आहोत तसतसे पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरुकता आणण्यात आणि बदलाचे समर्थन करण्यात पृथ्वी दिन महत्त्वाची भूमिका बजावत राहील. आपल्याला सभोवतालच्या जगात मूर्त बदल करण्याची संधी दिली जाते. आपण उचललेले प्रत्येक पाऊल, कितीही लहान असले तरीही, आपल्या ग्रहाचे भविष्यातील पिढ्यांसाठी संरक्षण आणि जतन करण्याच्या मोठ्या जागतिक प्रयत्नांमध्ये योगदान देते. या मोहिमेचे उद्दिष्ट सरकार, व्यवसाय आणि व्यक्तींना निरोगी, समृद्ध आणि न्याय्य भविष्याचा एकमेव मार्ग म्हणून हरित अर्थव्यवस्थेत गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करणे असे आहे. पृथ्वीच्या तापमानवाढीला मानवी हस्तक्षेप स्पष्टपणे कारणीभूत आहे. जीवाश्म इंधन अर्थव्यवस्था आणि जुन्या वारसा तंत्रज्ञानापासून दूर जाणे आणि आपल्या ग्रहाचे आरोग्य पुनर्संचयित करणारी, आपल्या प्रजातींचे संरक्षण करणारी आणि सर्वांना संधी देणारी एकविसाव्या शतकातील अर्थव्यवस्था तयार करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने कृती करण्यास वचनबद्धता दाखवली आणि उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूक केली तर हवामानबदलावर मात करणे शक्य आहे.

व्यवसाय, गुंतवणूकदार आणि वित्तीय बाजार यांनी त्यांच्या संस्था आणि समाजासाठी हरित नवकल्पनाद्वारे नानाविध उपक्रम राबवले पाहिजेत. सरकारांनी नागरिक, व्यवसाय आणि संस्थांना सार्वजनिक हितासाठी प्रोत्साहित केले पाहिजे आणि समान आणि शाश्वत जागतिक आर्थिक व्यवस्थेसाठी फ्रेमवर्क तयार केले पाहिजे. मतदार आणि ग्राहक या नात्याने नागरिकांनी सर्व स्तरांवर अशा शाश्वत उपायांसाठी प्रयत्न केले पाहिजेत. आता जगातील बहुतांश देशांमध्ये २२ एप्रिल रोजी 'जागतिक पृथ्वी दिन' साजरा केला जात आहे.

वास्तविक, हा दिवस अमेरिकन सिनेटर गेलॉर्ड नेल्सन यांच्या विचारांची देणगी आहे. अनेक वर्षांपासून ते सर्वांसाठी पर्यावरणरक्षणाचा मार्ग शोधण्यात गुंतले होते. खरे तर आपण प्रत्येक दिवस वसुंधरा दिन मानून पृथ्वीच्या संरक्षणासाठी काही तरी करत रहायला हवे; पण आपल्या कामात व्यस्त असलेल्या लोकांनी जागतिक वसुंधरा दिनानिमित्त थोडाफार हातभार लावला तर पृथ्वीवरील ऋण कमी होऊ शकते. पृथ्वी ही एक अतिशय व्यापक संज्ञा आहे; ज्यामध्ये पाणी, हिरवळ, वन्यजीव, प्रदूषण आणि त्याच्याशी संबंधित नानाविध घटकांचा समावेश होतो. पृथ्वी वाचवणे म्हणजे सर्वांचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेणे; पण त्यासाठी एकच दिवस माध्यम म्हणून वापरणे योग्य नाही. म्हणूनच प्रत्येक दिवस वसुंधरा दिन मानून तिच्या संरक्षणासाठी काही उपाय करत राहिले पाहिजेत. **

# प्रयोगशील व्यक्तिमत्त्व डॉ. सुनील दादा पाटील

प्रबळ इच्छाशक्ती आणि जिद्द असली की, व्यक्ती शून्यातून विश्व निर्माण करतो. आकाशालाही गवसणी घालू शकतो. कष्ट हेच माणसांच्या स्वप्नांचे पंख आहेत. कितीही प्रतिकूल वादळे आली तरी त्यांच्यावर मात करतो. मएरवी झाडे बेईमान झाली आहेत, अशी मुळांची तक्रार असलीफ तरीही काही झाडे मात्र, शेवटपर्यंत मातीशी घट्ट नाते सांगतात. आपल्या मुळा-तळाला विसरत नाहीत. अगदी असेच साहसी, विनयी आणि प्रयोगशील व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. सुनील पाटील.

जरी माणूस आधी विचार करू लागला आणि पुस्तके खूप नंतर तयार झाली, तरी माणूसपणाच्या प्रवासाला दिशा आणि गती देण्याचे काम पुस्तकेच करीत आली आहेत. देकार्तने असे म्हटले की, 'आय थिंक, देअरफॉर आय एम.' माणूस म्हणून आपले अस्तित्व आपल्या विचार करण्यात असते. माणूस जसा विचार करतो तसाच तो बनतो, असे पवित्र बायबलमधील एक वचन आहे. आज आपल्या विचारांचा मूलाधार वाचन असल्याने आपले प्राक्तन घडविण्यात पुस्तकांची भूमिका मोठी आहे. जे इतिहास विसरतात त्या दुर्दैवी जीवांच्या वाट्याला त्याची पुनरावृत्ती येते. यशाची हवा डोक्यात जाऊ न देता ते जमिनीवर आहेत. ज्या प्रतिकूल परिस्थितीतून आपण आलो त्याची जाण ठेवत त्यांचे विविधांगी प्रयोगशील कार्य सातत्याने सुरू आहे. खास करून पश्चिम महाराष्ट्राच्या कोल्हापूर पट्ट्यात डॉ. पाटील वेगाने त्यांचे काम करीत आहेत. त्यांचे वास्तव्य सद्या जयसिंगपूर, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर या ठिकाणी आहे. त्यांचे मूळ गाव बुलढाणा जिल्ह्यातील जामगाव, तालुका - मेहेकर हे आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावी झाले. शालेय शिक्षण मेहेकरला तर हैद्राबाद येथून त्यांनी इतिहास विषयात आचार्य ही पदवी मिळविली.

खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांवर पाचगणी व महाबळेश्वर येथे ते बरेच काळ शिक्षक म्हणून कार्यरत होते तर जयसिंगपूर येथे प्राचार्य म्हणून त्यांनी सेवा बजावली. नोकरी निमित्त त्यांची बरीच भटकंती झाली आणि आयुष्य समृद्ध झाले. आता जयसिंगपूर येथे ते संपादन, मुद्रण, प्रकाशन आणि ग्रंथ वितरण या व्यवसायात सेटल झाले आहेत. त्यांच्या पुस्तकांना खूपच प्रतिसाद मिळाला. हळूहळू उद्योग वाढत जाऊन तो एक नामांकित बनला. आपला उद्योग त्यांनी अत्यंत काटेकोरपणे वाढवला आणि अतिशय साधेपणाने ते आपल्या आयुष्यात वावरत आहेत. डॉ. पाटील यांनी शून्यातून उभा केलेला हा त्यांचा व्यवसाय प्रचंड मोठा बनला नसता तरच नवल! स्वत:साठी त्यांनी अनेक कठोर आणि शिस्तबद्ध नियम घालून घेतले आहेत. त्यांच्या यशाचे गमक कष्टात आणि दूरदृष्टीमध्ये आहे. त्यांच्या मूळगावी जामगाव, तालुका - मेहेकरला ते कधीतरी सणावाराला आणि उन्हाळ्यातील सुट्टीत येत असतात. यांचे बालपण अतिशय कष्टात गेले. मेहेकर शहरातील डॉ. डी. एम. चांगाडे आणि डॉ. नंदकुमार नहार यांच्या दवाखान्यात शालेय जीवनात त्यांनी कंपाउंडरचे काम केल्याची आठवण ते आवर्जून सांगतात. वेळ प्रसंगी



सार्वजनिक वनीकरण खात्याच्या वृक्षारोपण योजनेत रस्त्याच्याकडेला भर उन्हात पाच - दहा किलोमीटर पायी चालत जाऊन खड्डे खोदल्याचे आणि इतरांच्या शेतीवर मोल-मजूरी केल्याचीही त्यांना आठवण आहे. घरी थोडी-फार शेती असली तरी ती शाश्वतीची नव्हती म्हणून त्यांची पावले शिक्षणाकडे वळली. वाचनाने त्यांना आत्मभान दिले. अर्थात त्यासाठी त्यांना खूप कष्ट सोसावे लागले. शालेय जीवनातच त्यांना वाचनाची गोडी लागली. त्यातूनच त्यांची प्रतिभा बहरली आणि त्यांना लिहिण्याचा छंद जडला. त्यांनी अनेक नवसाहित्यिकांना बळ दिले. भूमिका घेऊन लिहिणाऱ्यांची संख्या कमी होत असताना त्यांच्या साहित्यातून नव्या पिढीला नक्कीच प्रेरणा मिळते. महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

ग्रामीण जीवन, लोकसंस्कृतीचा प्रभाव त्यांच्या एकूणच साहित्यावर राहिला आहे. त्याशिवाय 'कवितासागर साहित्य अकादमी'च्या माध्यमातून त्यांनी गावगाड्यातील अनेक लेखकांना नेहमीच बळ देण्याचे काम केले आहे. अनेक पुरस्कार, मान-सन्मान मिळूनही मातीत पाय घट्ट रोवून उभे असलेले डॉ. पाटील नव्या पिढीसाठी अनेक अंगांनी आदर्श आहेत. भोवतालातील विविध घटना-घडामोडीवर भाष्य करत समाजाला सतत जागे ठेवणारे प्रागतिक लेखक म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यांचे साहित्यिक योगदान मोठे आहे.

चांगली पुस्तके आपल्या संग्रही असली पाहिजे या निर्धाराने पुढे त्यांनी नव्या पुस्तकासह कैक रद्दीची दुकाने धुंडाळली. त्यातूनही अनेक पुस्तके खरेदी केली. आज त्यांच्या वैयक्तिक ग्रंथालयात ३० हजारांहून जास्त पुस्तके आहेत. विशेष म्हणजे त्यात सात हजार मराठी कवितासंग्रह आणि आठ हजारापेक्षा अधिक जगभरातील दिवाळी अंक आहेत. याचा त्यांना अभिमान आहे. त्यांच्या जयसिंगपूर येथील घरामध्ये पुस्तकेच पुस्तके भरलेली आहेत. घराला जणू भिंतीच नाही असेच वाटते. दिवाणखान्यापासून ते बेडरूम, किचनपर्यंत सर्वत्र पुस्तके रचून ठेवलेली आहेत. कवितासागर पब्लिशिंग हाउस या प्रकाशन संस्थेच्या पुस्तकासाठी तर स्वतंत्र गोडावूनच त्यांनी तयार केले आहे.

कोल्हापूर परिसरात छोट्या-छोट्या गावांमध्ये त्यांनी अनेक ग्रंथ प्रदर्शने आणि साहित्य संमेलने भरविली आहेत. तीन वर्षात ३६० पुस्तके प्रकाशित करण्याचा विक्रम त्यांच्या कवितासागर पब्लिशिंग हाउस, जयसिंगपूर या मुद्रण आणि प्रकाशन संस्थेच्या नावावर आहे. यासह अनेक अफलातून प्रयोगामुळे आज वयाच्या अवघ्या त्रेचाळीसाव्या वर्षात असताना त्यांच्या नावाची आशिया बुक ऑफ रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड यासह एक डझनाहून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड बुकमध्ये त्यांच्या कार्याची नोंद आहे. ग्रंथ व्यवहार तसेच वाचन संस्कृती टिकवण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना अनेक 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरवण्यात आलेले आहे. याशिवाय त्यांनी संशोधन, लेखन आणि विवेचनाच्या माध्यमातून भारतीय साहित्य समृद्ध केले आहे.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, पुणे या प्रकाशन क्षेत्रातील शिखर संस्थेने त्यांच्या कवितासागर प्रकाशन संस्थेस २०२०, २०२१, २०२२, २०२३ आणि २०२४ या सलग पाचही वर्षी बेस्ट पब्लिकेशन 'कॅटलॉग'चा राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पुरस्कार प्राप्त झाला तसेच त्यांच्या विविध पुस्तकांना अनेक उत्कृष्ट ग्रंथ निर्मितीचे पुरस्कार मिळाले आहेत. डॉ. पाटील हे एक उपक्रमशील मुद्रक-कवी-संपादक आणि प्रकाशक आहेत. अनेक चांगल्या लेखक - कवींना घडविण्याचे कार्य त्यांनी केले आहे. पुस्तकप्रेम व वाचनवेड हा त्यांचा श्वास आहे.

वाचन संस्कृतीच्या वाढीसाठी त्यांनी सांगली आणि कोल्हापूर येथील कारागृहात केलेल्या प्रबोधनामुळे कैदीदेखील वाचनाकडे वळले. अनेक कैदी लिहू लागले. कैद्यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारीदेखील डॉ. पाटील यांनी घेतली. त्यातून काही कैद्यांची पुस्तके देखील त्यांनी स्व:खर्चाने प्रकाशित केली. विशेष म्हणजे कैद्यांचे वाचनविश्व वाढावे यासाठी त्यांनी आजवर जवळपास तीन हजार पुस्तके कारागृहातील ग्रंथालयाला भेट स्वरुपात दिली आहेत. बरेचसे कैदी त्यांची शिक्षा समाप्त झाल्यानंतर घरी जाण्याआधी त्यांना भेटायला येतात. तुम्ही दिलेल्या पुस्तकांच्या वाचनाने माझे आयुष्य बदलले असे आवर्जून सांगतात. दोन वर्षापूर्वी सांगली कारागृहातील एका कैद्याच्या कथा तर त्यांनी तब्बल ४० पेक्षा अधिक दिवाळी अंकात छापून आणल्या होत्या. असे मुलखावेगळे विविध प्रयोग डॉ. पाटील यांनी आजवर केलेले आहेत. त्यांच्या 'प्रिझन लायब्ररी' या उपक्रमा अंतर्गत शेकडो कारागृहांना मराठी-हिन्दी- संस्कृत आणि इंग्रजी हजारो ग्रंथ भेट स्वरुपात पाठविण्यात आले आहेत. निश्चितच त्यांच्या या नव्या उपक्रमामुळे कैद्यांच्या मानसिकतेत चांगले बादल घडत आहेत. त्यांनी कैद्यांसाठी विविध विषयांवरील तसेच व्यक्तिमत्त्व विकास आणि सकारात्मक विचारांच्या पुस्तकांचे जग उधडले आहे. कारागृहातील कैद्यांना शिस्त आणि वर्तनात बादल करण्याचे काम कारागृहाच्या प्रशासनाकडून होत असते. प्रशासनाच्या कामाला पाठबळ देण्यासाठी ते नियमितपणे ग्रंथ भेट स्वरुपात पाठवत असतात.लहानपणी घरच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे त्यांचे बालपण फारसे सुखकर गेले नाही. दुसऱ्यांची पुस्तके घरी आणून रात्रभर दिव्याखाली वाचत बसत. त्यांच्या शर्टला चार-चार ठिगळे असायची मात्र हातात पैसे आले की, पहिल्यांदा पुस्तके विकत घेऊन वाचत असत. पुढे - पुढे वाचलेले पुस्तक पुन्हा अनेकांना वाचायला देणे हा त्यांचा छंदच झाला. ते लोकांना केवळ वाचण्यासाठी प्रेरित करीत नसून नेमके काय वाचावे याचे सुद्धा उत्तम मार्गदर्शन करतात. त्यांनी आपल्या छंदात स्वत:ला झोकून दिले मात्र आपल्या आयुष्याकडे आणि परिवाराकडे मात्र त्यांनी अजिबात दुर्लक्ष होऊ दिले नाही. मुलांसाठी त्यांनी बाल वाचनालय सुरू केले आहे. याशिवाय वर्ष २००९ पासून त्यांनी वाचन संस्कृती वाढावी यासाठी अभिनव मोफत पोस्टल लायब्ररी हा उपक्रम सुरू केलेला आहे. डॉ. सुनील दादा पाटील आणि सौ. संजीवनी सुनील पाटील यांनी घेतलेला पुढाकार हा खरोखरच एक आदर्शवत आणि अभिमानास्पद आहे. सर्वांनी त्यांच्यापासून आदर्श आणि प्रेरणा घ्यावी. असेच त्यांचे कार्य असून कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

**

## वाचनीय पण अस्वस्थ करणारे...

# जिणं शोषितांचं

जिणं शोषितांचं, हे वृषाली मगदूम लिखित पुस्तक ग्रंथालीने देखण्या स्वरूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला लेखिकेचे ''मनोगत'' आहे. ''कचरावेचक भगिनींबरोबर गेली बावीस वर्षे वाटचाल करत असताना त्यांचे व्यथित, घायाळ करणारे जीवन जवळून पाहिले, अनुभवले. मनात झिरपत गेले. समाजात राहून समाजापासून नाळ तुटलेले, धर्म, जात, शिक्षण, आरोग्य, अंधश्रद्धा, लैंगिकता या सर्वच पातळ्यांवर वंचित, शोषित असणाऱ्या यांना समजून घेताना मती गुंग होते. ''लेखिका त्यांचे विविध प्रश्न स्त्री मुक्ती संघटने मार्फत, नवी मुंबई परिसरात सोडविण्याचा प्रयत्न, अन्य कार्यकर्त्यांसोबत करते आहे. प्रत्येक टप्प्यावर त्याच खूप शिकवतात. समृद्ध आणि शहाणे करतात, असे वृषाली यांना वाटते. या पुस्तकात एकूण बारा दीर्घ लेख समाविष्ट आहेत. पुस्तकाचे रंगीत आणि समर्पक मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे. संख्येने प्रचंड असूनही या स्त्रियांना समाजात स्वतःची अशी काही ओळख नाही, हे त्यातून जाणवते. या पुस्तकातील समाविष्ट लेख विविध नियतकालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झालेले आहेत.



जणं डम्पिंगवरचं!, या पहिल्या लेखात कचरावेचक स्त्रियांचे आणि त्यांच्या जीवनातील विविध अनुभव वाचावयास मिळतात. विविध महिला गटांच्या सभांतून स्त्री कार्यकर्ते त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या राहणीमानाची ओळख होते. डम्पिंग कचरावेचक स्त्रियांचे विविध अनुभव वाचकाला सुन्न करतात. या स्त्रियांच्या विविध समस्यांच्या निराकरणासाठी वारंवार आयुक्तालयात जावे लागते. लहानमोठे विविध प्रश्न सोडविताना कार्यकर्तेही थकून जातात. नोकरशाहीचे सहकार्यही मिळत नाही. कचरावेचकांना ओळखपत्र मिळवून देतानाचे अनुभव विलक्षण आहेत. ''आख्यान हातगाडीचं'' या लेखात कचरावेचक स्त्रियांना हातगाडीवर भाजी किंवा अन्य वस्तू विकता आल्यास त्यांचे आरोग्य, राहणीमान सुधारेल असे कार्यकर्त्यांना वाटल्याने त्यांनी अशा काही कुटुंबांना हातगाड्या मिळवून दिल्या. परंतु त्या मार्गात येणारे अडथळे दूर करताना वृषाली थकतात. माझं आरोग्य तुमच्या हातात, या लेखात गरीब आणि असहाय स्त्री रुग्णांना, रुग्णालयात योग्य उपचार कसे मिळत नाहीत ते सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. ढिम्म शासकीय यंत्रणा, खासगी उपचारांतून उच्च उत्पन्न मिळवण्याच्या मागे लागलेले, परिणामी सेवाभावी नसलेले (काही) डॉक्टर, यामुळे गरिबांच्या महत्त्वाच्या आरोग्यविषयक समस्या, कायद्यात सुयोग्य तरतूद असूनही, दुर्लक्षितच राहतात.

प्रा.शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

पुनर्वसन होताना..., लढाई जगण्याची, दुस्तर ही वाट, पॉक्सो आणि महानगरी अधोविश्व या विविध दीर्घ लेखांतून मांडलेले तपशील आणि निष्कर्ष सुजाण आणि सहृदय वाचकांना विषण्ण करणारे आहेत. शहरांजवळील वाढत्या झोपडपट्टीतील वाढते संसार, वाढती व्यसनाधीनता, किशोरावस्थेतच लैंगिक प्रेरणा चेतविणारे,सहज उपलब्ध होणारे व्हिडिओ यामुळे तेथील बहुतेक पुरुषांना फक्त लैंगिक प्रेरणाच महत्त्वाच्या वाटतात. आपल्या संसाराची आर्थिक जबाबदारी झटकून, सर्व काही स्त्रियांवर, आर्थिक जबाबदाऱ्यांचे ओझे ढकलले गेल्याने विविध प्रश्न उद्भवतात. परिणामी होणारे अनेक गुन्हे नोंदविलेच जात नाहीत. पोलीस, न्यायालये यांच्या अती संथगतीने होणाऱ्या मार्गक्रमणेतून ''सुयोग्य न्याय'' मिळण्यास होणारा प्रचंड विलंब आणि परिणामी त्रस्तांना मनस्ताप होतो. कमीअधिक प्रमाणात आज हे सार्वत्रिक झाले आहे. आर्थिक साक्षरता आणि शोषितांचं शोषण, या लेखाद्वारे निरक्षर, अल्पशिक्षित स्त्रियांची, घरोघरी पोहोचणाऱ्या विविध आकर्षक गुंतवणूक योजनांतून कशी प्रचंड प्रमाणात फसवणूक होते, हे स्पष्ट होते.

ओला कचरा, सुका कचरा यांचे विभाजन घरोघरी आणि हाउसिंग सोसायट्यांमध्ये झाल्यास, त्यामुळे एकत्र होणाऱ्या प्रचंड कचऱ्याच्या समस्येचे काही प्रमाणात निराकरण होण्यास मदत होऊ शकेल, हे लक्षात घेऊन वृषाली यांनी आपल्या सोसायटीत त्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यावेळी आलेले विलक्षण अनुभव, ''एक अनोखा अनुभव'' या लेखात वाचावयास मिळतात. ''आपले घर'' पूर्ण झाल्यानंतर, सहकारी तत्त्वाचे महत्त्व विसरले गेल्याने, उच्चउत्पन्न गटांतील गृहनिर्माण सोसायट्यातील वाढत्या भांडणांचे या लेखातून दर्शन घडते आहे. ''बारबाला : कायदा आणि भलावण'' हा लेख सरकार, बारवाले आणि शोषित बारबाला यांच्या स्थितीचे दर्शन घडवितो. महाराष्ट्रातील मुस्लिमांची सामाजिक-आर्थिक स्थिती, हा लेख वास्तवावर आधारित असून विचारप्रवर्तक आहे. त्यामध्ये सुचविलेले उपाय अमलात येणे सर्व भारतीय समाजाच्या कल्याणासाठी गरजेचेही आहे.

हे पुस्तक वाचून वाचकाला आपल्या समाजातील दुर्लक्षित समाजाच्या सर्वांगीण प्रश्नांचे दर्शन घडते. हे सारे प्रश्न कधी सुटणार आणि कोण सोडविणार या विचारांतून प्रचंड अस्वस्थता निर्माण होते. शासकीय यंत्रणा, सुयोग्य कायदे,, समाजसेवी संस्था यांच्या एकत्रित सहकार्याने आणि प्रयत्नांतून हा प्रश्न भावी काळात (कदाचित!) सुटू शकेल, अशी आशा निर्माण होते. पुस्तकाचे शेवटी लेखिकेचा सविस्तर, सचित्र परिचय करून देण्यात आला आहे.

**

पुस्तकाचे नाव : जिणं शोषितांचं
लेखिका : वृषाली मगदूम
प्रकाशन : ग्रंथाली,मुंबई - १६.
दूरध्वनी : (०२२) २४२१६०५०
पहिली आवृत्ती : २५.१२.२०२२
पृष्ठे :२०४. मूल्य : रु. ३००/-

# माऊ आई झाली !

माऊचं पोट फुगलयासारखं दिसतंय का गं अलिकडे ! मी तिच्या भांड्यात दूध देता देता हिला म्हटलं. हो ! दिसतंय,खरं ! ही म्हणाली. बहूतेक आई होणारसं दिसतंय !मला पण तसंच वाटतंय. दिसतेय,केवढीशी आणि आई होणार? तरीच दुधाची वेळ झाली की ओरडत येते,

एरवी चार, चार, तास कुठे गायब असते कुणास ठाऊक मी म्हटलं. असेल कुठेतरी ! असेच काही दिवस गेले. माझ्या कामात मी गुंतलो होतो, परत काही लक्ष गेलं नाही.



तिच्या वेळेला तिचं येणं जाणं , गायब होणं चालू होतं. पून्हा दोन तीन महिन्यांनंतर सहज लक्ष गेलं तर ती एकदम हाडकुळी, अशी दिसली. पोटाचा घेरही कमी झाला होता. अरेच्या ही एकदम अशी काय दिसतेय ?

शशिकांत मुद्देबिहाळकर
९७६७१५२६०८

हाडकुळी, बारीक, मी हिला म्हटलं, तर ती म्हणाली अहो, ती बहूतेक व्यालेली दिसतेय. पण मग पिल्ले कुठेयत ? काय माहीत कुठे ठेऊन आलीय, ती कसं असतं ! ना आईचं ? कुणालाही दिसणार,नाहीत अशा सुरक्षित ठिकाणी तिनं ती ठेवली असणार ! असतील, कुठेतरी ! दिसतील की नाही कुणास ठाऊक ? की परस्पर मोठी होऊन कुठेतरी निघूनही जातील ! त्यांचं थोडंच माणसासारखं असतं ?

मुलं म्हातारी झाली तरी आईचा जीव त्यांच्यातच अडकलेला ! हा विचार बाजूला पडला आणि रोजच्या धकाधकीत मी विसरूनही गेलो. आणि काय आश्चर्य! आज सुटी, म्हणून कधी नव्हे तर दुपारी अर्धा तास डोळा लागला. दुपारचे चार वाजले असतील, ऊठलो. चहाचा मंद सुगंध आला, हिने चहा ठेवला होताच. चहा घेऊन गाडी धुवून बाहेर,जाऊन यायचा विचार होता. चहा घेतला आणि गाडीच्या शेडमध्ये येऊन बघतो तर समोर ती आई, आणि तिची दोन छोटुकली पिल्लं गाडी खालूनच चमकणाऱ्या डोळ्यांनी माझ्याकडे रोखून पहात होती. अगं ही बघ ! माऊ आणि तिची पिल्लं ! मी जवळ जवळ ओरडलोच. अहो केवढयांदा ओरडताय काहीतरीच,? मी सकाळीच पाहिली आहेत, जसं काहीच विशेष घडलं नव्हतं, बायकोने शांतपणे सांगितलं. बायकांना कशातलही नाविन्य,थोडं कमीच असतं, आणि आनंदाची भरतीही कमीच ! मी मात्र ओरडलोच आनंदाने ईतका की ती गोंडस पिल्लं सुध्दा, न भिता माझ्याकडे चिमुकल्या डोळयांनी रोखून पहात होती. माऊनं आश्चर्याचा धक्का दिला होता.तिच्या मधून-मधून गायब होण्याचं कोडं ऊलगडलं होतं खरं. आमची माऊ आई झाली होती.



# ... पिवळ्या धम्मक फुलांनी रस्ते फुलले



शोभिवंत फुलोऱ्यासाठी परिचित असलेला एक बहुवर्षायू वृक्ष. बाहवा हा पानझडी वृक्ष फॅबेसी कुलातील असून त्याचे शास्त्रीय नाव कॅसिया फिस्चुला आहे. 'फिस्चुला' या इंग्रजी शब्दाचा अर्थ मराठीत 'नळी' असा होतो. बाहवा वृक्षाची शेंग नळीसारखी असल्यामुळे त्याच्या शास्त्रीय नावात 'फिस्चुला' ही संज्ञा आली आहे. चिंच, टाकळा व गुलमोहर या वनस्पतीही याच कुलातील आहेत. बाहवा वृक्ष मूळचा दक्षिण आशियातील असून विशेषेकरून भारत, पाकिस्तान, म्यानमार, श्रीलंका इ. देशांतील आहे. अनेक देशांत या वृक्षाची लागवड शोभेकरिता केली जाते.

एप्रिल महिना निघाला की, रस्त्याच्या कडेला हिरवीगार पानाच्या झाडांमधून खाली जमिनीवरून लोंबकळणारी पिवळ्या फुलांची झाडे सर्वांचे लक्ष वेधून घेत असतात.बहावा असे त्या पिवळ्या धमक फुलांच्या झाडाचे नाव असून ते झाड फुलांनी बहरले कि पुढील ६० दिवसांनी पाऊस येतो असे साधारण म्हटले जाते. मात्र बहावा बहराला कि यावर्षी चांगला पाऊस होईल अशी अटकळ शेतकरी बांधून असतात. त्यामुळे बहाव्याच्या पिवळी धमक फुले पाहून बळीराजा आणि निसर्गप्रेमी खुश तसेच आनंदी आहे.

चैत्राचे आगमन झाले की निसर्गात अनेक रंगीबेरंगी फुले फुलायला सुरुवात होते. करंज, करवंद, कुडा यांच्यासोबत आणखी एक झाड संपूर्ण फुलांनी बहरते; ते झाड म्हणजे 'बहावा'. हा १०० टक्के भारतीय कुळातील असून भारताच्या विविध भागात आढळते पिवळ्या धमक फुलांच्या पाकळ्यांनी भरलेले बहाव्याकडे पाहणे म्हणजे नेत्रसुख देत असतो. या झाडाला मराठीत 'बहावा' तर शास्त्रीय नाव 'कॅशिया फिस्टुला' हे नाव आहे. त्याच्या शेंगेवरून पडले. बहाव्याचा वृक्ष साधारण ८ ते १० मी. पर्यंत उंच वाढतो आणि त्या वृक्षाची पाने संयुक्तपर्णी समसंख्य असून ४ ते ८ पर्णिकांच्या जोड्या मिळून एक पान बनते. हिवाळ्यात वृक्ष पर्णहीन असतो. बहाव्याच्या अंगुराच्या झुपक्यासारख्या दिना पिवळ्या फुलांचे सौंदर्य वेड लावणारे असते. बहुगुणी बाहवा एक वनौषधी म्हणून उपयोगान अतो. फुलांच्या सोनेरी रंगामुळे हा वृक्ष 'गोल्डन शोवर ट्री' म्हणून ओळखला जातो.

संतोष पेरणे

बहावा ही आकर्षक पिवळ्या रंगाची फुले येणारी वनस्पती आहे. बहावा फुलण्याचा मार्च ते मे हा काळ आहे. एप्रिल महिन्यात बहावा ही वनस्पती पूर्णतः फुलून येते; परंतु यंदा बहावा ही वनस्पती मोठया प्रमाणात बहरली आहे. यावरून पावसाचा अंदाज बांधला जातो. बहाव्याच्या बहरण्यावर यंदाच्या मोसमात वेळेवर आणि चांगला पाऊस होण्याचे संकेत बहावा वनस्पतीने दिले आहेत. पूर्वीच्या काळी पावसाचा अंदाज घेण्यासाठी कोणती आधुनिक साधने, यंत्रसामग्री नव्हती; परंतु निसर्गच पावसाच्या आगमनाचा संकेत द्यायचा आणि आताही निसर्ग तेच काम करतो. त्यामुळे शेतकऱ्याला पावसाचा अंदाज घेता येत असे. निसर्गातील प्रत्येक झाडाचा फुले, फळे येण्याचा एक विशिष्ट काळ आहे. काही झाडे, वनस्पतींचे काही गुण आहेत. यावर्षी बहावा वनस्पतीला सर्वत्र मोठय़ा प्रमाणात बहार आला आहे. यावरून यंदाचा पाऊस वेळेवर आणि चांगला होईल असे संकेत यावर्षी शेतकऱ्यांना मिळत आहेत. सध्या वैज्ञानिक युगामध्ये पाऊस कधी येणार, हे सांगणारी यंत्रणा, हवामानशास्त्र प्रगत असले, तरी ग्रामीण भागातील शेतकरी, आनांधव हे अनेक गोष्टींवरून पाऊस लवकर येणार की उशिरा येणार, याचा अंदाज घेतात. निसर्गाच्या आगमनाची चाहूल देतो. अनेक वनस्पती या नैसर्गिक बदलाचे संकेत, उलट असल्याने शेतकऱ्यांचे बहाव्याच्या झाडाकडे विशेष लक्ष असते.

निसर्गामध्ये अनेक वनस्पती, झाडे आहेत. त्यांच्या बहरण्यावरून पावसाचा अंदाज काढता येतो. मोहाच्या झाडाला लागणारी मोहफुले बहरण्यावरून आदिवासी बांधव पावसाचा अंदाज काढतात. त्याचप्रमाणे बहावा या झाडाला किती फुले, यावरून यावर्षं विदीगात पाऊस पडणार किंवा पावसाळा कसा राहील, याचा अंदाज बांधला जातो. द्राक्षाच्या झुपक्यासारख्या दिसणाऱ्या पिवळ्या फुलांचे सौंदर्य वेड लावणारे असते. बहुगुणी बाहवा एक वनौषधी म्हणून उपयोगात आणला जातो. फुलांच्या सोनेरी रंगामुळे हा वृक्ष 'गोल्डन शोवर ट्री' म्हणून ओळखला जातो.कर्जत तालुक्यातील बहुतेक रस्त्याच्या आजूबाजूला बहाव्याची झाडे फुललेली दिसून येत आहेत. त्यात सर्वाधिक झाडे कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग तसेच कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर आढळून येत आहेत. दहिवली येथील प्राध्यापक महाविद्यालयाबाहेर आणि नेरळ रेल्वे स्थानकाबाहेर असलेले बहाव्याचे झाड फुलले आहे. नेरळ कळंब रस्त्यावर देखील रस्त्याच्या कडेला फुललेले बहाव्याचे झाड वाहनचालक आणि वाहनातून प्रवास करणारे यांचे लक्ष वेधत आहेत. जेमतेम पंधरा दिवस बहाव्याला पिवळी धमक आणि आकर्षक वाटणारी फुले असतात, त्यामुळे निसर्गप्रेमी त्याचा कसा आस्वाद घेतात आणि आपले कुतूहल जागृत करतात हे पाहण्यासारखे आहे.

या गोल्डन शॉवर ट्री बद्दल कवी अरुण पाटील यांनी रचलेली कविता विशेष सांगणारी आहे. कवी अरुण पाटील म्हणतात

*हिरवी हिरवी गार*
*साडी नवरी नेसली*
*सोनपिवळी फुलांची*
*अंगी हळद माखली ....*

**

निवडक

## पोलार्ड, डेव्हिडवर कारवाई

**मुंबई :** पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात १८ एप्रिलला झालेल्या सामन्यात किरॉन पोलार्ड आणि टीम डेव्हिड यांनी मोठी चूक केली, ज्यामुळे त्यांच्यावर आता कारवाई करण्यात आली आहे. मुंबई इंडियन्सचा फलंदाज टीम डेव्हिड आणि फलंदाजी प्रशिक्षक किरॉन पोलार्ड यांना पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल या दोघांवर कारवाई करण्यात आली आहे. आयपीएलने स्वतः टीम डेव्हिड आणि पोलार्डवर लावण्यात आलेल्या दंडाबाबत माहिती दिली आहे.

## आशुतोष शर्मा चमकला

**मुंबई :** पंजाब किंग्ज इंडियन प्रीमियर लीग मध्ये सलग सामने हरत आहे. परंतु संघाचा युवा फलंदाज अष्टपैलू आशुतोष शर्माने सर्वांची मने जिंकली आहेत. मध्य प्रदेशातील रतलाम येथील २५ वर्षीय आशुतोषने अनेक वेळा पंजाबला पराभवाच्या उंबरठ्यावरून विजयाच्या मार्गावर परतवले होते. सध्या आशुतोष पंजाबचा या मोसमातील दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्याच्या पुढे शशांक सिंग आहे. मात्र, दुसऱ्या टोकाला साथ न मिळाल्याने संघाला पराभवाला सामोरे जावे लागले.

## ईशा,भावेश पहिल्या स्थानावर

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिंपिक चाचणी रायफल-पिस्तूल प्रकारात महिलांच्या २५ मीटर पिस्तूलमध्ये ईशा सिंगने पहिले स्थान मिळवले आहे; तर पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूलमध्ये भावेश शेखावत पहिल्या क्रमांकावर आहे.दिल्लीतील कर्णी सिंग नेमबाजी रेंजवर ही स्पर्धा आजपासून सुरू झाली. ईशाने एकूण ५८५ गुणांची कमाई केली. तसेच रॅपिड फायर प्रकारात तीन सिमरनप्रीत कौर ब्रार हिच्यावर दोन गुणांची आघाडीही घेतली. विजयवीर आणि अनिश यांनी या प्रकारात ऑलिंपिक कोटा मिळवलेला आहे.

## पंजाब किंग्जचं नशीबच फुटकं!

**पंजाब :** आयपीएल २०२४ मध्ये पंजाब किंग्जचं नशीब सध्या खराब आहे. प्रीती झिंटाच्या संघानं या हंगामात शेवटच्या षटकात ४ सामने गमावले. त्यापैकी काही सामन्यांमध्ये ते विजय मिळवू शकले असते. १८ एप्रिलला झालेल्या मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यातही पंजाबचा संघ दुर्दैवी ठरला. आयपीएलच्या या हंगामात पंजाबनं आतापर्यंत खेळलेल्या सर्व सामन्यांवर नजर टाकली तर लक्षात येतं की, पंजाबचा संघ शेवटच्या षटकात ४ सामने हरला आहे.

## चेन्नईसाठी जडेजा तारणहार!

**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्सनं शुक्रवारी लखनऊ सुपर जायंट्स विरुद्धच्या सामन्यात एक नवा प्रयोग केला. चेन्नईचे दोन गडी लवकर बाद झाले होते. त्यानंतर संघानं अष्टपैलू रवींद्र जडेजाला चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवलं. रवींद्र जडेजानंही त्याला सोपवलेलं काम चोख पार पाडलं आणि संघाला अडचणीच्या परिस्थितीतून बाहेर काढलं. जडेजानं हे काम चोख पार पाडत ३४ चेंडूत अर्धशतक झळकावलं. अर्धशतक पूर्ण केल्यानंतर त्यानं आपलं अनोखं तलवारबाजीचं सेलिब्रेशनही केलं.

# आयपीएलमध्ये होणार उलथापालथ!

## सात संघांच्या कर्णधारांवर येणार बंदी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**आयपीएल २०२४ मध्ये दररोज एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळत आहेत. पण लवकरच मोठी उलथापालथ होऊ शकते. बीसीसीआय आयपीएलच्या कर्णधारांवर मोठी कारवाई करण्याच्या तयारीत आहे. आयपीएल २०२४ दरम्यान केवळ एक किंवा दोन फ्रँचायझींच्या नाही तर एकूण ७ संघांच्या कर्णधारांवर बंदी घातली जाऊ शकते. कालपर्यंत या यादीत केवळ ५ कर्णधारांची नावे होते, ज्यांच्यावर बंदी घातली जाऊ शकते. परंतु आता या नको असलेल्या यादीत आणखी २ कर्णधारांची नावे समाविष्ट झाला आहे.**



चेन्नई आणि लखनऊ यांच्यात झालेल्या सामन्यानंतर ऋतुराज गायकवाड आणि केएल राहुल यांच्या अडचणीही वाढल्या आहेत. या सामन्यानंतर बीसीसीआयने दोन्ही कर्णधारांवर प्रत्येकी १२ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.स्लो ओव्हर रेटसाठी दोघांनाही दंड ठोठावण्यात आला आहे. या सामन्यापूर्वी बीसीसीआयने ५ कर्णधारांवर हा दंड ठोठावला होता. हार्दिक पांड्या, शुभमन गिल, संजू सॅमसन, ऋषभ पंत, श्रेयस अय्यर, ऋतुराज गायकवाड आणि केएल राहुल यांच्या नावांचा या विशेष यादीत समावेश आहे.

आयपीएलमध्ये पहिल्यांदाच स्लोओव्हर रेटमध्ये कोणी दोषी आढळल्यास त्याच्यावर १२ लाख रुपयांचा दंड ठोठावला जातो. दुसऱ्यांदा कर्णधाराला २४ लाख रुपये आणि संघातील खेळाडूंना ६ लाख. जर ही चुक तिसऱ्यांदा झाली तर कर्णधारावर एका सामन्याची बंदी घालण्यात येते. या यादीत समाविष्ट असलेल्या कर्णधारांपैकी दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार ऋषभ पंतला सर्वात जास्त टेन्शन आहे. कारण पंतला दोनदा दंड ठोठावण्यात आला आहे, आता जर पंतला स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावला तर त्याच्यावर एका सामन्याची बंदी घालण्यात येईल. बीसीसीआयच्या निर्णयामुळे आयपीएलमध्ये मोठी उलथापालथ होऊ शकते.

# गुकेश पुन्हा संयुक्तपणे आघाडीवर

## आव्हानवीरांची बुद्धिबळ स्पर्धा

**। टोरांटो । वृत्तसंस्था ।**

अझरबैजानच्या निजात अबासोवचा बचाव भेदण्याचा शानदार खेळ भारताच्या डी गुकेशने केला आणि आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेत १२ व्या फेरीनंतर पुन्हा संयुक्त आघाडी घेतली; मात्र भारताचे दुसरे आशास्थान असलेले आर. प्रज्ञानंद आणि विदित गुजराथी स्पर्धेतून बाहेर गेल्यातच जमा आहे. संयुक्तपणे पहिल्या स्थानावर डी. गुकेशसह इयान नेपोम्नियाथी आणि हिकारू नाकामुरा असे तिघे जण प्रत्येकी ७.५ गुणांसह पहिल्या क्रमांकावर आहेत. आता गुकेश आणि नाकामुरा यांनीही आपली दावेदारी दाखवली आहे.

१७ वर्षीय गुकेश हा आव्हानवीरांच्या स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात लहान खेळाडू आहे. १९५९ च्या स्पर्धेत बॉबी फिशर सर्वात लहान खेळाडू स्पर्धेत सहभागी झाला होता. अबासोवविरुद्धच्या आजच्या सामन्यात काळ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या गुकेशला विजयाची नितांत गरज होती. त्याने निमझो इंडियन बचाव पद्धतीने खेळ करून अबासोवला कोंडीत पकडले.नेपोम्नियाथी याने आजच्या १२ व्या डावात भारताच्या प्रज्ञानंदविरुद्धचा डाव बरोबरीत राखला. प्रज्ञानंद सहा गुणांसह पाचव्या; तर विदित पाच



गुणांसह सातव्या क्रमांकावर आहे.

महिला विभागात चीनचे वर्चस्व कायम राहिले आहे. झ्योंगी टॅन हिने बल्गेरियाच्या कॅटरिना लागनोविरुद्धचा सामना अनिर्णित राखला. भारताच्या कोनेरू हम्पीने रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिनाविरुद्धची लढत अनिर्णित सोडवली; तर प्रज्ञानंदची बहीण असलेल्या आर. वैशालीने स्पर्धेतील आपला दुसरा विजय मिळवताना युक्रेनच्या ॲना मुझीचुकचा पराभव केला. टॅनने सर्वाधिक ८ गुण मिळवून आघाडी कायम ठेवली आहे. टिंगजेई लेई ही तिच्यापेक्षा अर्ध्या गुणानेच मागे आहे. त्यामुळे महिलांमध्ये चुरस कायम आहे.

## नवगावमध्ये टेनिस क्रिकेटचा थरार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील नवगावमधील न्यु जय हनुमान मित्र मंडळाच्या वतीने दोन दिवस टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. शनिवारी (दि.२०) क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा डॉ. उल्हास वाटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी उपसरपंच निखील कवळे, राजेंद्र ठाकूर, न्यु जय हनुमान मित्र मंडळाचे पदाधिकारी, सभासद, खेळाडू, क्रीडा प्रेमी उपस्थित होते.

नवगावमधील ग्रीन पार्क स्टेडिअममध्ये होणाऱ्या या स्पर्धेत एकूण २४ संघाने सहभाग घेतला आहे. उद्घाटनीय सामना माधुरी ताई स्मरणार्थ नवगाव संघ व धोकवडेमधील न्यु जय हनुमान संघ या दोन संघात झाला. यामध्ये



नवगाव संघाने उत्कृष्ट कामगिरी बजावत उद्घाटनीय सामना जिंकला. रविवारी(दि.२१) सायंकाळपर्यंत या स्पर्धा रंगणार आहेत. अंतिम सामन्यानंतर प्रथम क्रमांक रोख वीस हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांक दहा हजार रुपये व तृतीय क्रमांकाला पाच हजार रुपये व चषक देऊन गौरविले जाणार आहे.

# रेयाल माद्रिदकडून गतवर्षाच्या पराभवाची परतफेड

## ■ पेनल्टी शूटआऊटवर गतविजेत्या मँचेस्टर सिटीवर मात

**। मँचेस्टर । वृत्तसंस्था ।**

कमालीच्या उत्कंठावर्धक झालेल्या सामन्यात रेयाल माद्रिदने गतविजेत्या मँचेस्टर सिटीचा टायब्रेकरवर ४-३ असा पराभव केला आणि चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. रेयालने सिटीविरुद्ध पहिल्या आणि दुसऱ्या लढतीत मिळून ४-३ अशी बाजी मारली.

युरोपियन फुटबॉलमध्ये बलाढ्य समजल्या जाणाऱ्या रेयाल माद्रिदने १५ व्या चॅम्पियन्स लीग विजेतेपदासाठी अपेक्षा उंचावल्या आहेत. यंदा त्यांच्या मार्गात गतविजेते असलेल्या मँचेस्टर सिटी या संघाचाच मोठा अडथळा होता.



मँचेस्टर सिटीच्या होम ग्राऊंडवर हा सामना असल्याने रेयालला प्रेक्षकांचाही पाठिंबा नव्हता. अशा परिस्थितीत त्यांनी टायब्रेकर जिंकण्याची किमया केली. संपूर्ण सामन्यात सिटीचे वर्चस्व होते; परंतु गोल करण्यात त्यांचा सफाईदारपणा कमी पडत होता. अखेर पेनल्टी किकमध्ये रेयाल माद्रिदच्या खेळाडूंनी संयम राखत बाजी मारली.

गतवर्षीही मँचेस्टर सिटी आणि रेयाल माद्रिद यांचा उपांत्य फेरीतच सामना झाला होता. त्यावेळी दुसऱ्या टप्प्यातील सामना सिटीच्या याच घरच्या मैदानावर झाला होता. त्यात त्यांनी ४-० असा दणदणीत विजय मिळवला होता. त्या वेळी झालेल्या पराभवाची रेयाल माद्रिदने परतफेड केली.

### बायरन म्युनिकचा विजय

**दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात बायरन म्युनिकने आर्सनेरचे आव्हान १-० असे मोडून काढले आणि उपांत्य फेरी गाठली. पहिल्या लढतीतील निकालानंतर त्यांनी दोन सामन्यांच्या सरासरीत ३-२ अशी बाजी मारली. या दुसऱ्या सामन्यात निर्णायक गोल किमिचने ६३ व्या मिनिटाला केला.**

# दुबईतील पावसाचा भारतीय खेळाडूंना बसला तडाखा

## ऑलिम्पिक कोटा मिळवण्याच्या आशा मिळणार धुळीस?

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

दुबईत झालेल्या वादळी पावसामुळे आलेल्या महापुराचा फटका भारतीय कुस्तीपटू दीपक पुनिया आणि सुजीत कालाकल यांना बसला आहे. बिशकिक येथील आशिया ऑलिंपिक पात्रता स्पर्धेसाठी ते वेळेत जाऊच शकले नाहीत.किर्गिस्तानची राजधानी असलेल्या बिशकिक येथे ही स्पर्धा आजपासून सुरू झाली. आजच्या पहिल्या दिवशी खेळाडूंची वजने होणार होती; परंतु पुनिया आणि कालाकल यांचे दुबईतून येथे विमान उशिरा आल्याने ते सहभागी होऊ शकले नाही.

पुनिया आणि सुजीत यांनी कसाबसा मार्ग काढून बिशकिक येथे दाखल झाले; परंतु अनिवार्य असलेल्या वजन तपासणीसाठी ते हजर होऊ शकले नाहीत. अगोदरच तेथे दाखल झालेल्या भारतीय प्रशिक्षकांनी विनंती करूनही त्यांना वजन तपासणीत दाखल करून घेण्यास संयोजकांनी नकार दिला. पुनिया टोकियो ऑलिंपिक स्पर्धेत पदक मिळवण्याच्या जवळ गेला होता. यंदा त्याच्यासह कालाकल पॅरिस ऑलिंपिकसाठी पात्र ठरण्याच्या आशा अधिक होत्या. या ऑलिंपिकसाठी पात्र ठरण्यासाठी ही दुसरी सर्वात मोठी स्पर्धा आहे.

### नाईन-ए-साईड महिला फुटबॉल स्पर्धा

# ॲस्पायर एफसी संघ अजिंक्य

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

अपराजित ॲस्पायर एफसी संघाने कमालीचे सातत्य राखताना नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स आयोजित इन्फिनिटी टू के ट्वेन्टी फोर नाईन-ए-साइड महिला फुटबॉल स्पर्धेचे दिमाखात विजेतेपद पटकावले.

ऑनवर्ड टेक्नॉलॉजिस पुरस्कृत ॲस्पायर एफसीने अंतिम फेरीत दिएगो ज्युनियर एफसीए संघावर ४-१ असा सहज विजय मिळवला. रितिका सिंग आणि पूजा गुप्ताने प्रत्येकी दोन गोल करताना विजयात मोलाचा वाटा उचलला.



प्रतिस्पर्धी टीमकडून एकमेव गोल श्वेता मलंगवे हिने केला. ॲस्पायर एफसीने संपूर्ण स्पर्धा गाजवली. स्पर्धेत अपराजित राहताना ५ सामन्यांत १७ गोल केले आणि केवळ एक गोल स्वीकारला. ॲस्पायर एफसीच्या सांघिक विजयात त्यांच्या सहा खेळाडूंचा मोठा वाटा राहिला. ॲस्पायर एफसीने डिएगो ज्युनियर्स एफसीला१-० असे हरवत विजयी सलामी दिली. त्यात समृद्धी काटकोळेचा एकमेव गोल निर्णायक ठरला. गो स्पोर्ट्सकडून पुढे चाल मिळण्यापूर्वी, दुसऱ्या फेरीत त्यांनी अशोका एफसीचा ९-० असा धुव्वा उडवला.

### ॲथलेटिक्स संघटनेच्या

## भूमिकेला विरोध

**जिनिव्हा :** पॅरिस ऑलिम्पिकमधील ट्रॅक अँण्ड फिल्ड प्रकारातील प्रत्येक सुवर्णपदक विजेत्यास रोख ५० हजार डॉलरचे पारितोषिक देण्याच्या जागतिक ॲथलेटिक्स संघटनेच्या निर्णयास अन्य देशांच्या ऑलिम्पिक संघटनांकडून विरोध होत आहे.

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती कधीच रोख पारितोषिक देत नाही. खेळाडूंना त्यांच्या देश आणि राज्याकडून रोख पारितोषिके दिली जातात. अर्थात, असा निर्णय प्रत्येक देश किंवा राज्य घेत नाही. त्यामुळे आम्ही हा निर्णय घेतला, असे 'को' म्हणाले होते.

### स्वर्गीय धनंजय भिडे सेव्हन-अ-साईड फुटबॉल चषक स्पर्धा

# गनर्स एफसी संघाला सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद

**। पुणे । वार्ताहर ।**

रमणबाग माजी विद्यार्थी फुटबॉल संघ यांच्या वतीने व पीडीएफएच्या मान्यतेखाली होत असलेल्या दुसऱ्या स्वर्गीय धनंजय भिडे सेव्हन-अ-साईड फुटबॉल चषक स्पर्धेत गतविजेत्या गनर्स एफसी संघाने सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद संपादन केले.

शनिवार पेठ येथील न्यू इंग्लिश स्कुल रमणबाग मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत गनर्स एफसी संघाने रुपाली स्पोर्ट्स क्लब संघाचा टायब्रेकरमध्ये ३-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. चुरशीच्या अंतिम फेरीच्या सामन्यात सुरुवातीला दोन्ही संघांनी सावध खेळ केला. त्यामूळे पूर्वार्धात गोलशून्यबरोबरी कायम होती.

उत्तरार्धात गनर्स एफसीच्या सूरज कदम, हर्षल वाळवेकर या आघाडीच्या फळीने जोरदार आक्रमण केले, पण त्यात त्यांना यश आले नाही. निर्धारित वेळेत सामना गोल शुन्य बरोबरीत सुटल्यामुळे पंचांनी टायब्रेकर पद्धतीचा अवलंब केला. टायब्रेकरमध्ये गनर्स एफसीकडून जयंत निंबाळकर, आयुज कुटे, केदार मुलमंडकर यांनी गोल करून



संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. तर, रुपाली स्पोर्टस क्लबकडून अनिकेत कंद याला गोल मारण्यात अपयश आले.

उपांत्य फेरीत पहिल्या लढतीत गनर्स एफसी संघाने संगम यंग बॉईज संघाचा २-१ असा संघर्षपूर्ण पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात कृष्णा महनकाळे याने नोंदवलेल्या एक गोलाच्या जोरावर रुपाली स्पोर्टस क्लब संघाने राहुल एफसी संघाचा १-० असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

# तळातल्या संघांना प्लेऑफसाठी करावे लागणार नियोजन

# अर्धी आयपीएल संपली!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**आयपीएलचा जवळपास अर्धा टप्पा संपला आहे. जसजसे सामने होत आहेत, तसतसे प्लेऑफची शर्यत रोमांचक बनत आहे. आतापर्यंत राजस्थान रॉयल्स, कोलकाता नाइट रायडर्स, सनरायझर्स हैदराबाद आणि चेन्नई सुपर किंग्ज या संघांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. अनेक संघ आहेत ज्यांचा खेळ पाहता त्यांना प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्यात कोणतीही अडचण येणार नाही. त्याचबरोबर काही संघांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.**

**१. राजस्थान रॉयल्स -** राजस्थान रॉयल्स संघाने जवळपास प्लेऑफमध्ये एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यांच्याकडे ७ सामन्यांतून १२ गुण आहेत आणि त्यांना उर्वरित ७ पैकी फक्त ३ सामने जिंकायचे आहेत.

**२. कोलकाता नाइट रायडर्स -** केकेआर संघही प्लेऑफमध्ये जाण्याचा प्रबळ दावेदार आहे. संघाचे सध्या ६ सामन्यांतून ८ गुण आहेत. त्यांना आणखी किमान चार सामने जिंकावे लागतील किंवा उर्वरित आठ सामन्यांपैकी पाच सामने जिंकावे लागतील.

**३. चेन्नई सुपर किंग्ज -** पॉइंट टेबलमध्ये सीएसके तिसऱ्या



स्थानावर आहे. प्लेऑफमध्ये जाण्यासाठी त्यांना पण त्यांच्या उर्वरित ७ पैकी किमान ४ किंवा ५ सामने जिंकावे लागतील. आता त्याचे सात सामन्यात ८ गुण आहेत.

**४. सनराईजर्स हैदराबाद -** पॉइंट टेबलमध्ये सनरायझर्स हैदराबाद ८ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. ४ मध्ये जाण्यासाठी त्यांना पण त्यांच्या उर्वरित ८ पैकी किमान ४ किंवा ५ सामने जिंकावे लागतील.

**५. लखनौ सुपर जायंट्स -** केएल राहुलच्या लखनौचे सध्या आठ गुण आहे, पण त्यांचा संघ पाचव्या स्थानावर आहे. त्यांना पण टॉप ४ मध्ये पोहोचण्यासाठी उर्वरित ७ पैकी किमान ५ सामने जिंकावे लागतील. ४ सामने जिंकले तर त्यानंतर चर्चा नेट रनरेटची होईल.

**६. दिल्ली कॅपिटल्स -** पहिल्या सलग दोन पराभवानंतर दिल्ली कॅपिटल्सने चांगले पुनरागमन केले. आता संघ ७ सामन्यांत ६ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. जर त्यांना प्लेऑफमध्ये जायचे असेल तर त्यांना आणखी ५ सामने जिंकावे लागतील आणि नेट रनरेटही चांगला राखावा लागेल.

**७. मुंबई इंडियन्स -** सात सामन्यांत ६ गुणांसह मुंबई इंडियन्सचा संघ सातव्या स्थानावर आहे. जर त्यांना प्लेऑफमध्ये जायचे असेल तर त्यांना आणखी किमान ६ सामने जिंकावे लागतील. जर त्यांनी ५ सामने जिंकल्यास तर नेट रन रेट चांगला ठेवावा लागेल.

**८. गुजरात टायटन्स -** आठव्या स्थानावर ६ गुणांसह गुजरात टायटन्सचा संघ आहे. जर त्यांना प्लेऑफमध्ये जायचे असेल तर त्यांना उर्वरित ७ पैकी किमान ६ सामने जिंकावे लागतील. यासोबत नेट रनरेटही चांगला राखावा लागेल.

**९. पंजाब किंग्ज -** पंजाब किंग्जने आतापर्यंत ७ पैकी फक्त २ सामने जिंकले आहेत. त्यामुळे प्लेऑफमध्ये जाण्यासाठी त्यांना आता उर्वरित सर्व सामने जिंकावे लागणार आहेत. एकही सामना हरला तरी नेट रनरेट इतर संघांपेक्षा चांगली असावी लागेल.

**१०. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू -** आरसीबीचा संघ आता सध्या तळाशी आहे. त्याने आतापर्यंत फक्त १ सामना जिंकला आहे. जर त्यांना प्लेऑफमध्ये जायचे असेल तर त्यांना उर्वरित सात सामने जिंकावे लागतील आणि नेट रनरेट चांगला ठेवावा लागेल. एकही सामना गमावल्यास ते बाहेर जातील.

### भारतीय सशस्त्र दलांच्या महिला अधिकाऱ्यांची

## मिशन साहस-एकता मोहीम यशस्वी



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय सशस्त्र दलांच्या तिन्ही सेवांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बारा महिला अधिकाऱ्यांच्या गटाने मुंबई-लक्षद्वीप-मुंबई अशी चार्टर्ड नौकानयन मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली. २७ दिवसांचे महिलांचे ब्लू वॉटर सेलिंग प्रशिक्षण हे सहभागी महिला अधिकाऱ्यांच्या धैर्याचा आणि कौशल्याचे अनोखे उदाहरण ठरले आहे.

मुंबई येथे लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कमांडंट लेफ्टनंट जनरल ए. के. रमेश यांच्या हस्ते मोहिमेला हिरवा कंदील दाखवण्यात आला. प्रशिक्षण मोहीम मार्वे येथून रवाना झाली आणि २००० नॉटिकल मैलांचा खडतर प्रवास करून नेव्हल डिटेचमेंट, एंड्रोथ, लक्षद्वीप येथे पोहोचली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)